सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३०७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १२ जानेवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषदची निवडणूक घ्या

### सुप्रिम कोर्टाची राज्य निवडणूक आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ; पूर्वी ३१ जानेवारीची होती मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

राज्यातील प्रलंबित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या निवडणुका पूर्ण करण्यासाठी न्यायालयाने आयोगाला १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे निवडणुकांच्या घोषणेची प्रतीक्षा करणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांना आता आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे.



सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. मात्र, प्रशासकीय अडचणी आणि प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अधिक वेळ हवा असल्याने आयोगाने १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ मागितली होती. आज या अर्जावर सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली.

सुप्रीम कोर्टाने राज्य निवडणूक आयोगाची विनंती मान्य केली आहे. राज्य निवडणूक आयोगाला जिल्हा परिषद निवडणुकांसाठी १५ दिवसांची मुदतवाढ दिली असून,आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ज्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमधील ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडली गेली नाही, त्या निवडणुका तुम्ही पूर्ण करा, असे कोर्टाकडून सांगण्यात आले.

**आरक्षणाचा पेच आणि नवीन याचिका**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण मर्यादेचा मुद्दा कळीचा ठरला आहे. १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्या येथे आरक्षण ५० टक्क्यांच्या आत असल्याने त्यांच्या निवडणुका घेण्यास तांत्रिक अडचण नाही. २० जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली असल्याने त्यांच्या निवडणुकांवर प्रश्नचिन्ह आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातून एक नवीन याचिका दाखल करण्यात आली आहे. नगरपालिका आणि महापालिकांप्रमाणेच ५० टक्के मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्या निवडणुकाही न्यायालयीन निकालाच्या अधीन राहून एकाच वेळी घेण्यात याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे.

**आयोगापुढील पेच: एकत्रित की टप्प्याटप्प्याने?**

सध्या राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा धुराळा उडालेला आहे. या निवडणुका संपण्यापूर्वीच जिल्हा परिषदांच्या निवडणुका जाहीर होतील, असा अंदाज वर्तवला जात होता. मात्र, आता १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत मिळाल्यामुळे जिल्हा परिषद निवडणुका काहीशा लांबणीवर पडल्या आहेत. आता राज्य निवडणूक आयोग केवळ आरक्षणाची मर्यादा न ओलांडलेल्या जिल्हा परिषदांची निवडणूक घेते की सर्वच जिल्ह्यांचा पेच सुटेपर्यंत थांबते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## मातोश्रीचे दार मी नाही, त्यांनीच बंद केले
## मी फोन करत होतो, ते बोलायला तयार नव्हते

### फडणवीसांचा ठाकरेंबाबत मोठा खुलासा


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२मुंबई**

मातोश्रीचे दरवाजे कोणासाठीही बंद नाहीत, असे म्हणणाऱ्या उद्धव ठाकरेंनी हे लक्षात ठेवावे की, ते दार मी नाही तर त्यांनीच बंद केले होते. मी वारंवार फोन करत होतो, पण त्यांनी फोन घेण्याचेही सौजन्य दाखवले नाही, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंच्या आरोपांना सडेतोड प्रत्युत्तर दिले.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते पुणे येथे बोलत होते. फडणवीसांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीतही युती तुटली तेव्हाच्या अनेक खळबळजनक बाबींचा खुलासा केला. २०१९ च्या निवडणुकीनंतरच्या घडामोडींवर बोलताना फडणवीस म्हणाले, आम्ही पाच वर्षे सोबत होतो, एकत्र निवडणूक लढलो. तरीही तुम्हाला जर फारकत घ्यायची होती, तर किमान 'देवेंद्रजी, माझे आता तुमच्यासोबत जमणार नाही' असे सांगण्याची माणुसकी तरी दाखवायला हवी होती. मी फोन करत होतो, पण ते फोनवर बोलायला तयार नव्हते. याचे साक्षीदार स्वतः एकनाथ शिंदे आणि मिलिंद नार्वेकर आहेत.

**बदनामी मी नाही, त्यांच्या लोकांनी केली**

मातोश्रीची बदनामी थांबवा, या उद्धव ठाकरेंच्या विधानाचा समाचार घेताना फडणवीस म्हणाले, इतक्या वर्षात मी मातोश्रीची कोणती बदनामी केली. मी बोललेलं एक स्टेटमेंट दाखवा. मी विरोधी पक्षनेता असताना आदित्य ठाकरेंवर मला विचारलं गेलं. मी एकमेव विरोओधी पक्षनेता होतो, मी म्हटलं मला असं वाटत नाही. त्यामुळे मी कधीही बिलो द बेल्ट आरोप करत नाही.



**त्यांच्या लोकांनी माझ्या पत्नीची बदनामी केली**

फडणवीस पुढे म्हणाले, मी त्यांच्यावर आरोप करत नाही. त्यांच्या लोकांनी माझ्याविरोधात माझ्या पत्नीविरोधात खालच्या स्तरावर जाऊन बदनाम केले. आमच्याबद्दल अश्लील लिहिले. पुरावे आहेत. तरीही मी त्यावर प्रतिक्रिया दिली नाही.

**आता मुंबईकरांच्या हृदयाचे दरवाजे उघडलेत**

उद्धव ठाकरे आता म्हणतात की दारे उघडी आहेत, पण आता मला कोणत्याही दरवाजाची लालसा उरलेली नाही. माझ्यासाठी आता मुंबईकरांच्या हृदयाचे दरवाजे उघडले आहेत आणि तीच माझी ताकद आहे, असे म्हणत फडणवीसांनी आता 'मातोश्री'शी पुन्हा सख्य होण्याची शक्यता पूर्णपणे फेटाळून लावली आहे.

**आम्हीच आमच्याविरोधात उमेदवार द्यायचा का?**

या मुलाखतीत मुख्यमंत्री फडणवीसांनी स्पष्ट शब्दांत उत्तर देत उमेदवारांच्या निवडीबद्दल सांगितले. तसंच त्यांनी याच मुद्यावरून विरोधकांनाही घेरले. या निवडणुकीमध्ये फक्त आमचे उमेदवार निवडून हे म्हणणे चुकीचे आहे. अपक्ष आणि इस्लामिक पार्टीचाही उमेदवार निवडून आलाय. अपक्षांची काय ताकद असते? पण तोही आला ना? किरीट सोमय्यांचे सुपुत्र नील सोमय्यांच्या विरुद्ध काँग्रेसने, उबाठाने, शरद पवारांनी उमेदवार दिला नाही. अपक्ष उमेदवार त्यांच्यापुढे आहे. अनेक ठिकाणी त्यांना उमेदवार नाही सापडले, असे फडणवीस म्हणालेत.

उद्धव ठकरेंची शिवसेना ही एकनाथ शिंदेंकडे आली, आता त्यांच्याकडे नेतेच राहिले नाही. आम्ही आघाडी केल्यावर महापालिका वनसाईड झाली. दुसऱ्या पक्षांचं अस्तित्व संपलं. अनेक वॉर्डात यांना उमेदवारच मिळाले नाही. जर उमेदवार देणार नसतील तर आम्ही स्वत: आणून उभे करायचे का? असा सवाल फडणवीस यांनी केला.

## स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता बदलणार; 'सेवा तीर्थ'साठी किती खर्च?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १२ नवी दिल्ली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं नवीन कार्यालयाचं लवकरच खुले होणार आहे. मकर संक्रांतीच्या निमित्ताने मोदी नव्या पीएमओमधून कामाला सुरुवात करतील. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्यांदाच पंतप्रधान कार्यालयाचा पत्ता बदलणार आहे. नवीन पीएमओ कार्यालय सेवा तीर्थ परिसराचा हिस्सा असेल. ज्यात पंतप्रधान कार्यालयासोबतच अन्य २ कार्यालये असतील. सेवा तीर्थ भागात एकूण ३ इमारती बनवण्यात आल्या आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी याच आठवड्यात रायसीना हिल्सजवळील नवीन कार्यालय सेवा तीर्थ १ इथून कामाला सुरुवात करू शकतात. हा परिसर सेंट्रल विस्टा पुनर्विकास प्रकल्पाचा हिस्सा आहे. आता पीएमओ साऊथ ब्लॉकमध्ये आहे. सेवा तीर्थ परिसरात पीएमओशिवाय कॅबिनेट सचिवालय आणि नॅशनल सिक्युरिटी कौन्सिल सेक्रेटेरियट यांचे कार्यालय असेल. त्यासाठी ३ इमारती बांधण्यात आल्या आहेत. कॅबिनेट सचिवालय मागील वर्षी सप्टेंबर महिन्यातच सेवा तीर्थ २ याठिकाणी शिफ्ट झाले आहे.

**११८९ कोटी खर्च करून उभारलं सेवा तीर्थ**

१९४७ मध्ये देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून पंतप्रधान कार्यालय साऊथ ब्लॉकमध्ये सुरू होते जे कायम भारताचे सत्ता केंद्र राहिले. आता पूर्ण सेवा तीर्थ परिसर जवळपास ११८९ कोटी खर्च करून उभारण्यात आला आहे. त्याला लार्सन ॲन्ड टुब्रो यांनी बनवले आहे. सेवा तीर्थ परिसर एग्झिक्यूटिव्ह एन्क्लेव्ह १ नावानेही ओळखला जातो. हे संपूर्ण कॉम्प्लेक्स २,२६,२०३ चौरस फूट क्षेत्रात पसरलेले आहे.

एग्झिक्यूटिव्ह एन्क्लेव १ जवळच एग्झिक्यूटिव्ह एन्क्लेव २ चं बांधकाम सुरू आहे. ज्याठिकाणी सात लोक कल्याण मार्गावरील पंतप्रधानांचं निवासस्थान अधिकृतपणे तिथे शिफ्ट होईल. नवीन कॉमन सेंट्रल सेक्रेटरीएट (उउड) इमारतींच्या बांधकामाचे काम सुरू आहे, जिथे विविध केंद्र सरकारच्या मंत्रालयांची कार्यालये स्थलांतरित केली जातील. यापैकी कर्तव्य भवन-३ चे उद्घाटन गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये झाले होते, जिथे गृह मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयासह इतर अनेक मंत्रालये देखील स्थलांतरित करण्यात आली आहेत.

## ठाकरे बंधूंच्या प्रचाराची दिशा अन् फोकस चुकतोय : चंद्रशेखर बावनकुळे यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नागपूर**

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महापालिका निवडणुकीच्या रणांगणात ठाकरे बंधूंच्या प्रचाराची दिशा आणि फोकस चुकत असल्याचा दावा केला आहे. उद्धव व राज ठाकरे यांच्या प्रचाराची दिशा चुकत असल्याचे मी वारंवार सांगत आहे. मी फार लहान माणूस आहे. मी त्यांना सल्ला देणार नाही. पण त्यांची पार्टी किंचित - किंचीत होत चालली आहे, असे ते म्हणालेत.



चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी नागपुरात पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी ठाकरे बंधूंसह विरोधकांवर कडाडून हल्ला चढवला. ते म्हणाले, राज ठाकरे व उद्धव ठाकरे भावनिक पद्धतीने बोलून जनतेच्या मनात संभ्रम तयार करत आहेत. त्यांना विकासाचा अजेंडा बाजूला करायचा आहे. राज व उद्धव यांना मी वारंवार सांगतो की, ते चुकत आहेत. त्यांच्या प्रचाराची भूमिका चुकत आहे. प्रचाराचा फोकस चुकत आहे. या पद्धतीने त्यांनी अनेकदा मतदान मागितले. पण काहीच मिळाले नाही. आता विकासावर बोलले तरच मतदान मिळते. मी या यंत्रणेतील फार लहान व्यक्ती आहे. मी राज ठाकरे किंवा उद्धव ठाकरे यांना सल्ला देणार नाही. पण त्यांची पार्टी किंचित - किंचित होत चालली आहे.

**मुंबईत ठाकरेंची अधोगतीच होईल**

ठाकरेंचा पक्ष लहान होण्याचे कारण असे आहे की, त्यांच्या प्रचाराची दिशाच चुकत आहे. त्यांनी निवडलेले विषय चुकत आहेत. त्यांनी निवडलेली प्रक्रिया चुकत आहे. त्यामुळेच त्यांची अधोगती होत आहे. माझ्या मते, मुंबईच्या निवडणुकीतही त्यांच्या पक्षाची अधोगती दिसून येईल. कारण, ते निवडणूक भरकटवण्याचा प्रयत्न करत आहेत. ही निवडणूक विकासाच्या मुद्यावर चालणार आहे. विकास म्हणजे फडणवीस व फडणवीस म्हणजे विकास हे लोकांना माहिती आहे. लोकं आता या विषयाला घेऊन मतदान करणार नाहीत. ठाकरे प्रत्येकवेळी मुंबई तोडण्याचे भूत उभे करतात. पण त्याचे काहीच होत नाही. आता म्हणतात मराठी अस्मिता. पण मतदार त्यांचे काहीही ऐकत नाहीत, असे ते म्हणाले.

**आदित्य ठाकरे व फडणवीसांची बरोबरी होऊ शकत नाही**

उद्धव ठाकरे यांनी विकासाच्या मुद्यावर देवेंद्र फडणवीस यांना आदित्य ठाकरेंशी चर्चा करण्याचे खुले आव्हान दिले आहे. पत्रकारांनी याविषयी बावनकुळेंना छेडले असता ते म्हणाले, लोकांनी अडीचवर्षे आदित्य ठाकरेंना पाहिले व फडणवीसांनाही पाहिले. त्यांनी विकासावर न बोललेले बरे. विकास हा असा नसतो. विकास हा जन्मापासूनच जनतेच्या सेवेत आपले आयुष्य द्यावे लागते. सोन्याच्या चमचाने बदामाचा ज्यूस पिऊन आलेले लोक विकासावर बोलूच शकत नाहीत. त्यांना मुंबई व महाराष्ट्र कोणत्या दिशेने चालला आहे हे कळत नाही. आदित्य ठाकरे हे देवेंद्र फडणवीस यांची बरोबरी कशी करणार? महाराष्ट्राच्या व मुंबईच्या जनतेला तरी हे मान्य आहे का? आदित्य ठाकरेंनाही हे मान्य आहे का? काहीतरी पोकळ गप्पा मारून विषय भरकटवायचा असा हा प्रकार आहे, असे बावनकुळे म्हणाले.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853




## तपोवनाची जागा कायम खुलीच राहील
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरोधकांवर बरसले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२नाशिक**

भाजप हा रामाला मानणारा पक्ष आहे. त्यामुळे तपोवनाबाबत काळजी घेऊन ही जागा कायम खुली ठेवण्यात येईल. त्या ठिकाणी कोणताही व्यावसायिक प्रकल्प उभारणार नाही. सिंहस्थापूर्वी गोदावरी नदीचे पाणी इतके शुध्द करू की त्यात अंघोळ करता येईलच, परंतु ते पिताही येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



नाशिक महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी (दि. ११) गोदाकाठी झालेल्या सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर जलसंपदामंत्री गिरीष महाजन, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, आ. देवयानी फरांदे, आ. राहुल ढिकले, आ. सीमा हिरे, माजी आ. बाळासाहेब सानप, सुनील केदार उपस्थित होते.

तपोवनात साधुग्रामसाठी वृक्षतोडीचा मुद्दा गाजत असताना फडणवीस यांनी गुगल इमेजेस दाखवीत याबाबत होत असलेल्या आरोपांचा समाचार घेतला. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलेल्या टीकेला उत्तर देताना २०१६ मध्ये महापालिकेत मनसेची सत्ता असताना तपोवनातील जागेचा वापर ११ वर्षे प्रदर्शनांसाठी करण्याचा ठराव महापालिकेच्या महासभेत केल्याचे कागदपत्रही फडणवीस यांनी दाखवले.

**कोविडकाळात सत्ताधारी घरात बसून होते**

काल परवा दोन भाऊ नाशिकला येऊन गेले, परंतु त्यांना रामाची आठवण झाली नाही... अशी उद्धव आणि राज यांच्यावर टीका करताना मुख्यमंत्री म्हणाले की, जो समाचा नाही, तो कामाचा नाही. डाव्या लोकांनी येथे आंदोलन करताना कुंभाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला आहे. अकबराने कुंभ सुरू केला असे ते सांगतात. मात्र, अकबराच्या कित्येक पिढ्यांआधी कुंभाचे स्नान सुरू झाले होते असे सांगत, कोणी टीका केली तरी कुंभ बंद पडणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोविड काळात आपण राज्यभर दौरा करत होतो. मात्र, हे सत्ता असताना घरात बसून होते अशी टीका त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली.

## संपादकीय ......

# विवेकानंदांचे विचार आणि युवाशक्ती

*१२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिन. हा दिवस 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारताच्या वैचारिक पुनर्जागरणाचे शिल्पकार होते. त्यांचे विचार आजही समाज, राष्ट्र आणि युवकांसाठी प्रेरणास्रोत आहेत.*

*स्वामी विवेकानंदांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलकात्यात झाला. त्यांचे मूळ नाव नरेंद्रनाथ दत्त. बालपणापासूनच ते बुद्धिमान, जिज्ञासू आणि निर्भीड स्वभावाचे होते. प्रश्न विचारणे, सत्य शोधणे आणि रूढी-परंपरांना आव्हान देणे ही त्यांची सहज वृत्ती होती. वडिलांकडून तर्कशुद्ध विचारांची देणगी, तर आईकडून धार्मिक आणि सांस्कृतिक संस्कार त्यांना मिळाले. या दोन्ही प्रवाहांचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात स्पष्टपणे दिसतो. रामकृष्ण परमहंस हे विवेकानंदांचे गुरू होते. 'ईश्वर अनुभवाने कळतो' हा रामकृष्णांचा संदेश विवेकानंदांनी केवळ आत्मसातच केला नाही, तर तो संपूर्ण जगापर्यंत पोहोचवला. त्यांनी वेदांचा गाभा आधुनिक भाषेत मांडला आणि अध्यात्म व विज्ञान यांच्यातील दरी मिटवण्याचा प्रयत्न केला.*

*१८९३ साली शिकागो येथे झालेल्या जागतिक धर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी दिलेले भाषण हा भारतीय इतिहासातील सुवर्णक्षण ठरला. 'माझ्या बंधूंनो आणि भगिनींनो' या शब्दांनी त्यांनी भाषण सुरू केले आणि संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. त्या भाषणाने भारताची आध्यात्मिक ओळख जगासमोर ठळकपणे मांडली. भारत म्हणजे केवळ गरिबी आणि अंधश्रद्धा नव्हे, तर सहिष्णुता, मानवता आणि विश्वबंधुत्वाची शिकवण देणारी संस्कृती आहे, हे त्यांनी जगाला पटवून दिले. 'जोपर्यंत देशातील शेवटचा माणूस उपाशी आहे, तोपर्यंत देवपूजा निरर्थक आहे,' असे ते ठामपणे सांगत. त्यांच्यासाठी मानवसेवाच खरी ईश्वरसेवा होती. युवकांवर स्वामी विवेकानंदांचा विशेष विश्वास होता. 'उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका,' हा त्यांचा मंत्र आजही युवकांना प्रेरणा देतो. शिक्षण म्हणजे काय, केवळ पुस्तके नव्हेत, विविध ज्ञानाचा संग्रह नव्हे. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'ज्या प्रशिक्षणामुळे वर्तमान आणि आविष्काराची अभिव्यक्ती नियंत्रणात आणली जाते आणि फलदायी बनते त्याला शिक्षण म्हणतात.' याचा अर्थ असा की, स्वामी विवेकानंदांना शिक्षणातून कल्पकता व सर्जनशीलता अभिप्रेत होती. शिक्षणाने माणसाला यंत्रवत बनवू नये, गुलाम बनवू नये, त्याला मुक्तपणे विचार करण्याची संधी शिक्षणाने दिली पाहिजे. शिक्षण हे शाश्वत व विकासाचे साधन व्हावे, शिक्षणाच्या माध्यमातून भारत एक समर्थ राष्ट्र म्हणून उभे राहावे, अशी त्यांची अपेक्षा होती. तेजस्वी ध्येयवादी आणि पोलादी मनगटाचा जागृत युवक, अशा बलशाली राष्ट्राचा आधार होय, असे त्यांचे मत होते.*

*विवेकानंद म्हणत, लोकांना शिक्षित करा, त्यांचे जीवन संस्कार प्रक्रियेतून वाढवा, त्यातून एक नवे राष्ट्र उभे राहू शकेल. अशा प्रकारे शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी शाश्वत विकासाचा मंत्र दिला. त्यांच्या मते, विद्यापीठे म्हणजे केवळ हस्तिदंती मनोरे नव्हेत. तसेच शिक्षण म्हणजे विद्यापीठाच्या ग्रंथालयातील हजारो पुस्तकांचे गठ्ठे नव्हेत. शैक्षणिक संस्था व विद्यापीठे ज्ञाननिर्मितीची केंद्रे व्हावीत, असा त्यांचा आग्रह होता. चांगले आदर्श शिक्षक विद्यार्थ्यांवर नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा संस्कार करू शकतात, असे त्यांचे मत होते. स्वामी विवेकानंदांचे राष्ट्रप्रेम केवळ भावनिक नव्हते, तर वैचारिक होते. भारत महासत्ता व्हावा, अशी त्यांची कल्पना भौतिक संपत्तीवर नव्हे, तर चारित्र्य, ज्ञान आणि आध्यात्मिक बळावर आधारित होती. पाश्चिमात्य देशांकडून विज्ञान, शिस्त आणि संघटन शिकावे, तर भारताने जगाला अध्यात्म, सहिष्णुता आणि मानवी मूल्ये द्यावीत, असा त्यांचा समन्वयवादी दृष्टिकोन होता. त्यांनी दाखवलेला मार्ग हा केवळ आध्यात्मिक उन्नतीचा नव्हे, तर सर्वांगीण मानवी विकासाचा आहे. त्यांच्या विचारांना केवळ भाषणांपुरते मर्यादित न ठेवता आचरणात आणले, तरच त्यांच्या कार्याला खरी श्रद्धांजली ठरेल. विचारांनी जागवलेले हे राष्ट्र घडवण्याची जबाबदारी आजच्या पिढीवर आहे आणि त्यासाठी स्वामी विवेकानंदांचे विचारच आपले सर्वात मोठे बळ आहेत.*

# ये जो मोहब्बत हैं...

यहाँ हर चीज बिकती हैं। सब पैसों का खेल हैं। पालिका इलेक्शन में सब उमीद्वार बेचे जा चुके हैं। इंडिया की डेमोक्रस्सी खतरे में है..। असे संजय राऊतजी याचे म्हणणे आहे. खरं तर देशातील एक गोष्ट संजयजींच्या इच्छेप्रमाणे होईल तर शपथ! आखिरकार वोटरोंका क्या होगा? हा संजयजींचा उद्विग्न करून टाकणारा प्रश्न ऐकून काळीज चर्र झाले.




एखादा माणूस रोज उठून जर बेंबीच्या देठापासून ओरडून सांगत असेल, तर देशातल्या कुणीतरी ते ऐकले पाहिजे, असे बाळकुंजे नामक एका ज्येष्ठ नागरिकांचे म्हणणे आहे. खरंच संजयजी आणि बाळकुंजे यांचे म्हणणे सोळाआणे सच आहे.

यहाँ हर चीज बिकती हैं... खरं तर गुरुदत्तच्या तोंडी शोभणारा हा डायलॉग आहे. मोहब्बत के खेल मैं नाकामयाब झालेला नायक सार्या दुनियेकडे असाच संशयाने बघत असतो. त्याला सगळे कस्मे वादे, प्यार वफाएँ म्हणजे नुसत्या गप्पा वाटू लागतात.

वैतागून वैतागून तो म्हणू लागतो, 'ये जो मुहब्बत हैं, बस उनका हैं काम...' आमचे काम नव्हेच ते! म्हणून जेव्हा आम्ही यारों हसीनों की गलियों से गुजरतो, तेव्हा हम निकलते हैं बस दूर ही से करके सलाम! तसं निवडणुका आणि राजकारण यातून गायब व्हायची वेळ संजयजी यांच्यावर आली की काय, अशी भीती वाटत आहे; पण शेवटी या देशातील मतदारांचे काय होणार, हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो; पण संजयजी, तुम्ही मतदारांचा विचारही आता सोडून द्यावा. कारण, तुम्ही म्हणता तसे मतदारसुद्धा विकले जात आहेत. क्यूंकी यहाँ हर चीज बिकाऊ हैं।

मतदारांना शहाणे करण्यात आपण कमी पडलो संजयजी! निवडणूक बिनविरोध होऊ लागली, तर मग निवडणुका घ्यायच्या तरी कशाला? कुस्ती न करताच पैलवान विजयी? पेपर न देताच पास झाला, तर पेढे कशासाठी वाटायचे? हे म्हणजे कलिंगडाला भाव मिळाला नाही म्हटल्यावर त्यावर रोटावेटर फिरविल्यासारखे आहे. उदाहरण थोडे चुकल्यासारखे वाटते का? यहाँ हर चीज बिकती हैं... हे आपले म्हणणे मात्र संजयजी खटकल्यावाचून राहत नाही. कारण, निवडणूक म्हटली की, बॅनर, मफलर, झेंडे, वडापाव, मिसळ, चहा, गुटखा इत्यादींची विक्री ही होणारच!

# मोबाईल दाखवून, जेवण भरवणाऱ्या पालकांना डॉक्टरांचा मोलाचा सल्ला

**दि.१२विदर्भ प्रजासत्ताक** – शेजारच्या काकूंचा नातू बघा कसा टम्म फुगलाय, आणि आपलं बाळ किती बारीक आहे... ही तुलनाच तुमच्या




मुलाचा आत्मविश्वास मारत आहे. घराघरांत बाळाला रडवून, हात धरून आणि मोबाईल दाखवून बळजबरीने जेवण भरवण्याचे प्रकार वाढत आहेत. यावर पुण्यातील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. सुजित भरत पाटील यांनी सोशल मीडियावर एक अत्यंत मार्मिक पोस्ट लिहून पालकांचे कान टोचले आहेत.

**अन्नावर प्रेम करायला शिकवा, तिरस्कार नको–** डॉ. पाटील यांनी एका परिचितांकडचा अनुभव सांगताना म्हटले की, अनेक घरांमध्ये बाळाचे हात पकडून, समोर मोबाईल लावून त्याच्या तोंडात वरण-भाताचे गोळे कोंबले जातात. बाळ ते जेवण 'गिळत' नाही तर कसाबसा 'ढकलत' असते. केवळ लोक काय म्हणतील या भीतीपोटी आपण बाळाला जेवण देत नसून एक प्रकारची 'शिक्षा' देत आहोत. यामुळे मुले अन्नाचा तिरस्कार करायला लागतात. माझं बाळ बारीक राहिलं तर लोक काय म्हणतील? फक्त या एका भीतीपोटी बाळाला जबरदस्तीने भरवले जाते. पण, पालकांनो आपल्याला घरात खेळणार बाळ हवंय की फक्त



वजन वाढलेली ब्रॉयलर कोंबडी? याचा विचार करा, असा सल्ला डॉ. पाटील यांनी दिला आहे.

**पालकांनो, विज्ञानाचे हे ३ नियम समजून घ्या–** १. बाळाचे पोट त्याच्या मुठीएवढेच

डॉक्टरांच्या मते, बाळाच्या पोटाची क्षमता त्याच्या स्वतःच्या मुठीएवढीच असते. आपण मोठ्यांच्या वाटीच्या मापाने त्याला ओव्हरफीड करतो, ज्यामुळे त्याची पचनशक्ती बिघडते आणि उलट्या होतात. त्याला सकस खाऊ द्या, पण प्रमाणात द्या.

**२. वाढीचा वेग नैसर्गिकरित्या मंदावतो**–पहिल्या वर्षात बाळाचे वजन वेगाने वाढते, पण १ ते ५ वर्षे या काळात वाढीचा वेग निसर्गतः मंदावतो. या काळात भूक कमी होणे हे पूर्णपणे सामान्य आहे, तो आजार नाही.

**३. बिस्किटे आणि मोबाईल 'जेवणाचे खरे शत्रू'**– बाळ जेवत नाही अशी तक्रार करणाऱ्या पालकांनी आधी घरातील बिस्किटांचे पुडे बाहेर फेकले पाहिजेत. साखर आणि मैद्यामुळे मेंदूला पोट भरल्याचा खोटा सिग्नल जातो. तसेच, मोबाईल दाखवून जेवण भरवल्याने मुलांचा अन्नाशी संपर्क तुटतो, ज्यामुळे पुढे जाऊन लठ्ठपणा आणि एकाग्रतेचा अभाव निर्माण होतो.

धोक्याची घंटा कधी समजावी?

बाळ बारीक असणे म्हणजे ते आजारी असणे नव्हे. डॉक्टरांनी काही धोक्याचे इशारे सांगितले आहेत. जर बाळ दिवसभर सुस्त असेल आणि खेळत नसेल. जर लघवी नेहमीपेक्षा कमी होत असेल. जर वजनाचा ग्राफ सतत खाली जात असेल. असे होत नसेल, तर काळजी करण्याचे काहीही कारण नाही.

**सोफ्यावरचा 'बटाटा' हवा की धावणारं 'हरिण'?**

शेवटी एक गंभीर इशारा देताना डॉ. पाटील म्हणतात की, आज मुलांचे गाल फुगवण्यासाठी त्यांना बळजबरीने तूप-साखर भरवून 'गोल' केले तरी, वयाच्या २५ व्या वर्षी त्यांना होणाऱ्या बीपी आणि डायबिटीजची पायाभरणी आपणच करत असतो. त्याचे गाल मोजण्यापेक्षा दिवसभरात तो किती वेळा मनापासून हसला, हे मोजा, असा मोलाचा सल्ला त्यांनी पालकांना दिला आहे. त्यांची ही पोस्ट सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

# तूर पिकावर 'या' दोन फवारण्या करा, किडींच्या नियंत्रणासाठी महत्वाचा उपाय, वाचा सविस्तर

**दि.१२ विदर्भ प्रजासत्ताक ३**

सध्या तूर पीक फुलावर आहे. मागील काही आठवड्यात असणारे ढगाळ वातावरण व रात्रीचे थंड हवामान असल्यामुळे तूर पिकाचे शेंगा पोखरणाऱ्या अळ्यापासून नुकसान होण्याची शक्यता आहे.

तरी शेतकरी बांधवांनी आपल्या पिकाची पाहणी करुन वेळीच उपाययोजना करून व्यवस्थापन करण्याची गरज आहे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नीलेश कानवडे यांनी केले आहे.




**पहिली फवारणी :** पीक ५० टक्के फुलोऱ्यावर असताना ५ टक्के निंबोली अर्क किंवा अझाडिरेक्टीन ३०० पीपीएम एक हजार मिली प्रती एकर किंवा अझाडिरेक्टीन एक हजार ५०० पीपीएम ५०० मिली प्रती एकर किंवा एचएएनपीव्ही २०० एलई. प्रती एकर किंवा बॉसिलस थुरिनजिएसिस ३०० मिली प्रती एकर किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी., ४०० मिली. प्रती एकर याप्रमाणे कोणत्याही एका किटकनाशकांची पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**दुसरी फवारणी :** (पहिल्या फवारणीनंतर १५ दिवसांनी) : इमामेक्टीन बेझोएट ५ एसजी. ६० ग्रॅम प्रती एकर किंवा लॅब्डा सायहॅलोथ्रिन ५ टक्के ईसी. २०० मिली प्रती एकर किंवा ईथिऑन ५० टक्के ईसी. ५०० मिली प्रती एकर किंवा क्लोरॅन्ट्रॅनीलिप्रोल १८.५ टक्के एससी. प्रवाही ६० मिली प्रती एकर याप्रमाणे कोणत्याही एका किटकनाशकाची पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**एकात्मिक व्यवस्थापन :**

या तिनही किडी कळ्या, फुले व शेंगावर आक्रमण करीत असल्यामुळे त्यांच्या व्यवस्थापनासाठी जवळ-जवळ सारखेच उपाय योजावे लागतात. प्रति हेक्टर २० पक्षीथांबे शेतात उभारावेत, त्यामुळे पक्षी किडीच्या अळ्या खाऊन फस्त करतात. तसेच घाटे अळीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० कामगंध सापळे लावावेत.

# राष्ट्रीय महामार्गावर धावत्या ट्रकने घेतला पेट

## तिवसा सॉफ्ट कॉर्नर परिसरात आगीने उडाली खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१२तिवसा :**

राष्ट्रीय महामार्गावरील तिवसा शहरातील सॉफ्ट कॉर्नर परिसरात रविवार (दि. ११ जानेवारी) सायंकाळी सुमारे ६.४० वाजताच्या सुमारास अचानक घडलेल्या एका थरारक घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. कलकत्त्यावरून निघालेला व नागपूर मार्गे अमरावतीकडे जाणारा एक अवजड १४ टायर ट्रक तिवसा शहरात प्रवेश करताच सुरुवातीलाच सॉफ्ट कॉर्नर परिसरात त्याच्या टायरचा जोरदार स्फोट झाला आणि क्षणार्धात ट्रकने भीषण आग घेतली.

सदर ट्रक (क्रमांक एन.एल. ०१ ए. डी. २६६१) हा कलकत्त्यावरून प्लास्टिक बारीक दाणा असे रॉ मटेरियल घेऊन (नापी) सुरतच्या दिशेने जात होता. सॉफ्ट कॉर्नरजवळ अचानक टायर फुटताच आगीचे लोट उठू लागले. आगीच्या तीव्रतेमुळे महामार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांमध्ये घबराट निर्माण झाली. अनेक वाहनचालकांनी आपली वाहने रस्त्याच्या कडेला थांबवून सुरक्षित अंतर राखले, तर

परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेची माहिती मिळताच



तिवसा नगरपंचायतीचे अग्निशामक दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अथक प्रयत्नांनंतर ३ तासानंतर अग्निशामक दलाने आग आटोक्यात आणली. याचवेळी तिवसा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारीही घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

सुदैवाने या भीषण घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र ट्रकचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही काळ राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेनंतर काही काळ तिवसा शहरात भीतीचे वातावरण पसरले होते. दरम्यान, टायर फुटण्यामागील नेमके कारण काय, याचा तपास सुरू असून पुढील तपास सुरू आहे. प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळल्याने नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

# राज्यातील कृषीपंपासाठी सोलर सक्तीच्या धोरणा विरोधात शिरजगांव मोझरीच्या शेतकऱ्यांचा एल्गार

## गावातीलच मारोती मंदिरातील गाव बैठकीत जनआंदोलनाचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२तिवसा** – राज्य सरकारने गेल्या दोन वर्षांपासून राज्यातील कृषी पंपासाठी सोलरची सक्ती केली आहे. विविध विहीरीच्या योजनेतून शेतकऱ्यांना विहीरी मिळाल्या मात्र, अद्यापही कृषी पंपासाठी विजेच्या कनेक्शन पासून शेतकरी वंचित आहे. सोलर पंप कनेक्शन घेणाऱ्या शेतकऱ्यांचे ढगाळ वातावरण, नादुरुस्त सोलर, वन्यप्राण्यांमुळे सोलर प्लेटचे नुकसान होत असल्याने ओलीत होत नाही. तर सोलर पंपाचे मेंन्टनंन्स डोकेदुखी ठरत असल्याने शिरजगांव मोझरी गावातील शेतकऱ्यांनी गाव बैठकीत राज्यपातळीवर जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने शुक्रवारी शासकीय विश्राम गृह तिवसा येथे



२ वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन शिरजगाव मोझरी येथील शेतकऱ्यांनी केले आहे.

शिरजगांव मोझरी गावातील मारोती मंदिरात नुकतीच गाव बैठक पार पडली आहे. राज्य शासनाच्या सोलर सक्तीच्या धोरणाविराधात शेतकऱ्यांनी एकमताने एल्गार पुकारला आहे. यासाठी शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून राज्यपातळीवर जनआंदोलन करण्यासाठी तिवसा तालुक्यातून सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. सोलर सक्ती शिवाय, नादुरूस्त ट्रान्सफार्मर, भंगार झालेले ट्रांसफार्मर बॉक्स यामुळे सुद्धा शेतकऱ्यांचे कृषी पंप बंद पडत आहे. तालुक्यासह राज्यभरात सर्वाधीक विहीरी एमआरईजीएस योजनेतून मंजुर आणि पुर्ण झाल्या आहे. मात्र, सोलर सक्तीमुळे शेतकऱ्यांची कोरडवाहू शेती अद्याप ओलीताखाली आली नसल्याने शेतकरी अधिक संकटात सापडला आहे.

तिवसा तालुक्तातील तब्बल १००० शेतकरी अद्याप विजेच्या कनेक्शनच्या प्रतिक्षेत आहे. काही शेतकऱ्यांनी मजबुरीने सोलर कनेक्शन घेतले आहे. मात्र, ढगाळ वातावरण, सोलर पॅनेल चोरी, पॅनेल फुटने, दुरूस्तीला पाठवल्यास वेळेत न मिळाल्याने रब्बीचे पिक धोक्यात सापडल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठा संताप दिसून येत आहे. त्यामुळे शिरजगांव मोझरी गावातील शेतकऱ्यांनी शासनाच्या शेतकरी विरोधी सोलर सक्तीच्या धोरणाविरोधात जनआंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. शिरजगांव मोझरी गावापासून सुरू झालेला हा लढा भविष्यात राज्यभरात पोहवण्याचे काम शिरजगावातील शेतकरी करणार असल्याचे निर्धार यावेळी शेतकऱ्यांनी घेतला आहे. यावेळी बैठकीला प्रशांत कांबळे, महादेव अंबुलकर, संदीप हगवणे, विजय कुरळकर, गोपाळराव वानखडे, वामनराव बेले, वासुदेवराव फटिंग, हरिदास खोंडे, जयंत तायवाडे, भास्कर येरणे, विनोद दरेकर, संदीप कोचर, सदानंद भालेराव यासह शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

> राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या विरोधात कृषी पंपाच्या सोलर सक्ती धोरणामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. हजारो विहिरी तयार असूनही त्यांची विजेच्या कनेक्शनसाठी अद्याप प्रतिक्षा आहे. भविष्यात जुने कृषी पंपाचे एजी कनेक्शन सुद्धा रद्द करून त्यांनाही सोलर सक्ती होऊ शकते. त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे जनआंदोलन उभारण्यासाठी एकजूट होण्याची गरज आहे.– **प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते–**

> सोलर पंप घेण्यात आले तेव्हा १६ हजार ५६० रुपये खर्च झाले. अनेकवेळा सोलर प्लेटा फुटल्या, सोलर नादुरुस्त झाले. संबंधित कंपनीला तक्रारी केल्यात मात्र अद्याप कोणीही सोलर कनेक्शन पाहणीसाठी आले नाही. सध्या ९ पैकी ८ प्लेट फुटल्या आहे. त्यामुळे अत्यंत कमी दबावात ओलीतासाठी पाणी मिळते. त्यामुळे रब्बी हंगामात एक एकरातील गहू सुद्धा सोलर पंपामुळे ओलीत होत नाही. सरकारने तातडीने आम्हाला एजीचे कनेक्शन द्यावे.– **अनिल वैद्य** , सोलर कृषी पंप धारक शेतकरी

> माझे दीड एक्कर शेतीमध्ये एमआरईजीएस योजनेत गेल्यावर्षी विहिर पूर्ण झाली. संध्या डिझेल इंजिनवर पाणी पिकांना देणे सुरू आहे. परंतु लागूनच दुसरे शेत असल्याने ओलीत जास्त आहे. त्यामुळे विद्युत विभागाकडे एजीच्या कनेक्शनसाठी अर्ज केला मात्र अद्याप कनेक्शनच मिळाले नाही. सोलर पंप बसवण्याची सक्ती सरकारची असल्याने आम्ही अडचणीत आहे.
> – **पंकज वानखडे,** शेतकरी, शिरजगाव मोझरी

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १२ जानेवारी २०२६

शहर/ग्रामिण

# अखेर भाजपचे १५ बंडखोर पक्षातून निलंबित

## शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** मतदानाच्या तोंडावर आणखी एक धमाकादीर्घ प्रतीक्षेनंतर जानेवारी २०२६ मध्ये होत असलेली महापालिका निवडणूक अनेक अर्थानी आगळी वेगळी ठरताना दिसत आहे. आरोप-प्रत्यारोप, चित्र-विचित्र युत्या आणि आघाड्या, पक्षांतर आदी विविध गोष्टींमुळे ही निवडणूक रंजक वळणावर येऊन ठेपली आहे. आता पक्षाने तिकीट नाकारल्याने भाजपविरूद्ध शड्डू ठोकून दुसरा मार्ग निवडणाऱ्या तब्बल १५ उमेदवारांवर भारतीय जनता पक्षाने पक्षशिस्त मोडल्याचा ठपका ठेवत निष्कासनाची कारवाई केली. मतदानाला अवघे तीन दिवस शिल्लक असताना भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी १५ बंडखोरांच्या हाती रविवार ११ जानेवारीला निलंबनाचे पत्र दिल्याने या निवडणुकीला अधिकच धार आली आहे.

### या १५ जणांचा समावेश

तिकीट वाटपात अन्याय झाल्याचा आरोप करीत भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते योगेश वानखडे, विवेक चुटके, धनराज चक्रे, मेघा हिंगासपुरे, सतीश करेसिया, सचिन पाटील, किशोर जाधव, गौरी मेघवानी, शिल्पा पाचघरे, ज्योती वैद्य, संजय वानरे, संजय कटारिया, दीपक गिरोळकर, रश्मी नावंदर, अनिषा मनीष चौबे, तुषार वानखडे, श्रद्धा गहलोत ठाकूर यांनी बंडखोरी केली होती.

### उघडपणे बंडखोरी...

तिकिट वाटपात पक्षपात झाल्याचा ठपका ठेवत उपरोक्त कार्यकर्त्यांपैकी काहींनी शिवसेना शिंदे गट, काहींनी युवा स्वाभिमान पक्ष तर काहींनी राष्ट्रवादीसोबत हातमिळवणी करून भाजप विरोधात निवडणूक मैदानात उडी घेतली, हा प्रकार पक्षशिस्त मोडणारा असल्याने या पंधरा कार्यकर्त्यांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. भारतीय जनता पक्षाचे सदस्य असताना देखिल या कार्यकर्त्यांनी पक्ष हिताला धक्का पोहोचेल असे कृत्य केले असून पक्षाच्या उमेदवारांच्या विरोधात उघडपणे - बंडखोरी केली आहे.



### शहराध्यक्षांच्या स्वाक्षरीने पत्र

पक्षाच्या निर्णयांना आव्हान देणारा हा प्रकार असल्याने यामुळे पक्षाची प्रतिमा मलिन झाल्याचा उल्लेख उपरोक्त १५ जणांना जारी करण्यात आलेल्या निलंबन पत्रात करण्यात आला आहे. त्यामुळे पक्षाच्या अधिकृत अधिकारांतर्गत व वरिष्ठ नेतृत्वाच्या निर्देशांनुसार सर्व बंडखोरांना भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांवरून निलंबित करण्यात येत असल्याचा उल्लेख या पत्रात आहे. भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी ही कारवाई केली आहे.

# ५२५ उमेदवारांचा सादर, १३६ उमेदवारांचा हिशेब अप्राप्त

## ७ झोन मधील २२ प्रभागात ६६१ उमेदवार निवडणूक रिंगणात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** मनपा निवडणुकीत खर्च मर्यादा निश्चित केली आहे. ड श्रेणीतील अमरावती मनपात आर्थिक मर्यादा ९ लाखनिश्चित करण्यात आली आहे. या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या दिशानिर्देशानुसार उमेदवारांना दैनिक खर्च अहवाल सादर करावा लागत आहे. मनपा निवडणूक रिंगणात उतरलेल्या एकूण ६६१ उमेदवारांपैकी ५२५ उमेदवारांनी रविवार ११ जानेवारीपर्यंतचा हिशेब सादर केला आहे. अजूनही १३६ उमेदवारांच्या हिशेबाचा अहवाल अप्राप्त आहे. विशेष म्हणजे प्रचारावरील खर्चावरनिवडणूक आयोगाचीविशेषसायबर टीमलक्ष ठेवून आहे.

झोन ७,६६१ उमेदवारझोन १ रामपुरी कॅम्पमध्ये ९७उमेदवार आपले नशीब अजमावत आहे. यापैकी ८३ उमेदवारांनी आपला हिशेब दिला आहे. तर या झोनमधील १४ उमेदवारांच्या हिशेबाचा पत्ता नाही.




झोन २ नवीन इमारत तहसील कार्यालयामधून १०० उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. यापैकी ८७उमेदवारांचा हिशेब मिळाला तर १३ उमेदवारांना हिशोब सादर करता आला नाही. झोन ३ राजापेठ श्री संत कंवररामधून ९४ उमेदवार निवडणूक मैदानात उतरले आहे. यापैकी ९२ उमेदवारांनी हिशेब सादर केला तर २ उमेदवारांचा हिशेब निवडणूक विभागाला मिळाला नाही. झोन ४ दस्तुर नगर मधून १०८ उमेदवार निवडणूक लढवित आहे. यापैकी ७६ उमेदवारांचा हिशेब पोहोचला आहे. तर ३२ उमेदवारहिशेब सादर करण्याचा विसर पडला आहे. झोन ५अंबापेठ मध्ये ८३ उमेदवार हे निवडणूक रणांगणात उतरले आहेत. त्यांच्यापैकी ६४ उमेदवारांना हिशेब सादर करता आला, तर १९ उमेदवारांचा हिशेब अप्राप्त आहे. झोन ६ जुनीतहसील कार्यालयमधून ५३ उमेदवार हे रिंगणात आहेत. त्यापैकी ३६ उमेदवारांनी हिशेब निवडणूक विभागाला पाठविला तर १७ उमेदवारांचा हिशेब मिळाला नाही. झोन ७ बडनेरामध्ये सर्वाधिक १२६ उमेदवार हे निवडणूक लढवित आहे. यापैकी ८७उमेदवारांचा हिशेब निवडणूक विभागाला मिळाला असून ३९ उमेदवारांचा हिशेब निवडणूक विभागापर्यंत पोहोचला नाही.

# 'गोल्ड बॉण्ड'च्या आमिषाने नांदगाव पेठमध्ये कोट्यवधींचा कथित घोटाळा

## सराफा व्यावसायिकाने केली ८८.९० लाखांची फसवणूक तीन वर्षांत रक्कम व सोने दुप्पट करण्याचे आमिष

### चेकऐवजी विड्रॉल स्लिप देऊन दिशाभूल केल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२नांदगाव पेठ–** 'गोल्ड बॉण्ड' व 'डिजिटल गोल्ड'च्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. रिद्धी ज्वेलर्सचा संचालक सतीशचंद्र एकनाथ बहाड याने तीन वर्षांत गुंतवलेली रक्कम व सोने दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून अनेक नागरिकांकडून तब्बल ८८ लाख ९० हजार रुपये तसेच मोठ्या प्रमाणात सोने जमा करून त्याची अफरातफर केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रकाशसिंग नारायणसिंग बैस, चंद्रशेखर मधुकराराव काळे, प्रदीप श्रीकृष्णराव इंगोले, संतोष भाऊराव शेकार, पंजाबराव श्रावणजी गुर्जर, शीतल महेशराव आसरकर, दीनेश रमेशराव गावनेर, प्रविण दिलीपराव भस्मे, उज्वल दीपकराव पांडे, उमेश सुरेशराव मोर्शे, रविंद्र गुलाबराव चोपकार, नितीन नामदेवराव बेहरे, गजानन रामरावजी चुळे, कल्पना संतोष भिलावे, मुकेश रमेशराव गावनेर, पृथ्वीराज लालसिंह राठोड, प्रदीप फुटाने, छाया फुटाने, उज्ज्वला निंघोट यांच्यासह इतर नागरिकांनी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, सतीशचंद्र बहाड गेल्या १० ते १५ वर्षांपासून नांदगाव पेठ येथे सराफा व्यवसाय करत असल्याने गावात त्याची विश्वासार्ह प्रतिमा होती. याच विश्वासाचा गैरफायदा घेत त्याने बँकेपेक्षा अधिक परतावा, स्वस्त दरात सोने तसेच सरकारच्या 'गोल्ड बॉण्ड' व 'डिजिटल गोल्ड' योजनांमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवले. जेवढी रक्कम किंवा सोने गुंतवाल, ते तीन वर्षांत दुप्पट करून देऊ, अशी कथित बनावट योजना नागरिकांसमोर मांडण्यात आल्याचा आरोप आहे.या आमिषाला बळी पडून अनेक नागरिकांनी आपले सोने, तर काहींनी रोख रक्कम रिद्धी सिद्धी ज्वेलर्सकडे जमा केली. तक्रारीत नमूद अधिकृत रक्कम ८८.९० लाख रुपये असली, तरी प्रत्यक्षात काही प्रतिष्ठित नागरिकांनी प्रत्येकी ५० ते ७० लाख रुपयांपर्यंत गुंतवणूक केल्याचा दावा असून, एकूण रक्कम १५ कोटी रुपयांपेक्षा अधिक असण्याची शक्यता तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. नागरिकांनी




गुंतवणुकीची पावती किंवा गोल्ड बॉण्डची मागणी केली असता, माझ्यावर विश्वास नाही का? असे म्हणत वेळ मारून नेण्यात आली. त्यानंतर आरोपीने आजारपणाचे कारण सांगून दुकानातील साहित्य घेऊन पसार झाल्याचा आरोप आहे.काही तक्रारदारांनी पैसे परत मागितल्यानंतर आरोपीने बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी तसेच स्टेट बँक ऑफ इंडिया येथील असल्याचे सांगून चेक दिले. मात्र हे चेक बँकेत सादर केल्यानंतर खात्यात पुरेशी रक्कम नसल्याचे समोर आले. कायदेशीर नोटीस दिल्यानंतर, आरोपीच्या वकिलांकडून मिळालेल्या उत्तरात हे दस्तऐवज अधिकृत चेक नसून चेकसारखे दिसणारे विड्रॉल स्लिप असल्याचे स्पष्ट झाल्याचा धक्कादायक दावा तक्रारीत करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अशाच प्रकारच्या विड्रॉल स्लिप इतर अनेक नागरिकांनाही देण्यात आल्याचा आरोप असून, ही बाब संबंधित बँकांच्या काही शाखांना माहिती असूनही फसवणूक रोखण्यासाठी ठोस कारवाई करण्यात आली नसल्याचा गंभीर आरोप तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे बँक अधिकाऱ्यांच्या संभाव्य संगनमताचीही चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.या प्रकरणी सखोल तपास करून आरोपीकडील हिशोबाची रजिस्टर जप्त करावीत, फसवलेली रक्कम व सोने पीडितांना परत मिळवून द्यावे तसेच दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी तक्रारदार नागरिकांकडून करण्यात येत आहे. नांदगाव पेठ पोलिसांनी तक्रारीच्या आधारावर पीडित फसवणूक झालेल्या नागरिकांचे बयान नोंदविणे सुरू आहे. घटनेमुळे नांदगाव पेठ परिसरात खळबळ उडाली असून पुढील पोलीस कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### लाल हिशोबाच्या रजिस्टरमध्ये व्यवहारांची नोंद

तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार आरोपीकडे दोन ते तीन लाल हिशोबाची रजिस्टर असून त्यामध्ये पैसे व सोने जमा केल्याची सविस्तर नोंद आहे. काही नागरिकांचे सोने गहाण घेऊन व्याजाने पैसे देण्याचे व्यवहारही तो स्वतःच नोंदवून ठेवत होता. कोणालाही अधिकृत लिखित पावती न देता विश्वासाच्या जोरावर व्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### कायदेशीर भीती दाखवून धमकीचा आरोप

फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तक्रारदारांनी उर्वरित रक्कम १५ दिवसांत परत देण्याची नोटीस पाठवली. मात्र आरोपीच्या वकिलांकडून २० हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवहार बेकायदेशीर आहे, तुमच्यावर गुन्हा दाखल करू, आयकर विभागाकडे तक्रार करू, अशी कायदेशीर भीती दाखवून धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. तक्रार मागे घेण्यासाठीच हा दबाव टाकण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# 'वस्तीवरची क्लासरूम' भटक्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण- मंगेश तायडे

## सप्तरंग क्रीडा मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना टी-शर्ट व शालेय साहित्याचे वाटप

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१२ नांदगाव पेठ -** मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून आत्मविश्वास, शिस्त आणि उज्ज्वल भविष्याची दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम वस्तीवरची क्लासरूम येथे होत आहे. शिक्षक चंदन सावंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी समाजाची खरी गरज ओळखून केलेला हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी असून, अशा प्रयत्नांमधूनच परिवर्तनाची खरी सुरुवात होते.वस्तीवरची ही क्लासरूम म्हणजे केवळ शिकवणी केंद्र नसून भटक्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे असे प्रतिपादन पत्रकार मंगेश तायडे यांनी केले. सप्तरंग क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. भटक्या समाजातील पहिली ते दहावीपर्यंतच्या गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देत त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य वस्तीवरच्या एका छोट्या क्लासरूममधून सुरू आहे. शिक्षक चंदन काशिनाथ सावंत, दिनेश भगवान शिंदे आणि करण शैलेंद्र शिंदे यांनी गावातील वस्तीवर क्लासरूम स्थापन करून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात शिक्षणाचा प्रकाश पेरला आहे.आई-वडिलांसोबत शिकारीसाठी भटकंती न करता विद्यार्थी गावातच राहावा, शिकावा आणि पुढे जावा, या उद्देशाने हे शिक्षक दररोज जवळपास ५० विद्यार्थ्यांना सकाळ-संध्याकाळ मोफत अध्यापनाचे धडे देतात. केवळ अभ्यासच नव्हे तर शैक्षणिक साहित्य, कपडे आणि मानसिक आधार देत या विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने उभे करण्याचे कार्य सुरू आहे. या प्रेरणादायी कार्याला सलाम करत सप्तरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र तुळे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शेंदोळा येथील वस्तीवरच्या क्लासरूम येथे सामाजिक उपक्रम राबवला. येथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना नोटबुक, पेन, टी-शर्ट आणि खाऊचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांशी हितगुज करत शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.या



कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र तुळे यांच्यासह मंगेश गाडगे, विनोद इंगळे, प्रफुल जवंजाळ, सचिन नर्सिंगकर, नमन कलंबे, पूर्वेश इंगोले, देवेश पोकळे आदी मान्यवर उपस्थित होते. भटक्या समाजातील मुलांच्या हातात वही-पेन देणे म्हणजे त्यांच्या आयुष्याला नवी दिशा देणे आहे. वस्तीवर सुरू असलेली ही क्लासरूम शिक्षणाचा दिवा पेटवणारी असून शिक्षक चंदन सावंत व त्यांच्या सहकाऱ्यांचे कार्य खऱ्या अर्थाने समाज परिवर्तन घडवणारे आहे.आपल्यासोबत वाढदिवस साजरा करण्याचा हा सर्वोत्तम मार्ग असून, अशा उपक्रमांतूनच मुलांचे भवितव्य उजळू शकते असे मत सप्तरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र तुळे यांनी यावेळी व्यक्त केले.सोबतच भविष्यात सुद्धा शैक्षणिक मदत करण्याचे आश्वासन दिले.यावेळी विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले तसेच विविध उपक्रमांबाबत त्यांनी उपस्थितांना माहिती दिली.

# वरूड नगर परिषदेतील काँग्रेसचा गट भाजपामध्ये विलीन




### जिल्हाधिकाऱ्यांसोबत पत्रव्यवहार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ अमरावती**

येथील नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपला एकतर्फी बहुमत प्राप्त झाले. अध्यक्षपदाची धुरा ईश्वर सलामे यांच्या हाती येताच, उर्वरित सभा म्हणजे उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्य व खाते वाटप करण्यापूर्वीच भाजपने काँग्रेसला जबरदस्त धक्का दिला आहे. नगर परिषदेमध्ये भाजपा १९, काँग्रेस २, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ४, प्रहार १, अपक्ष १ असे २६ नगरसेवक तर अध्यक्ष म्हणून भाजपाचे ईश्वर सलामे विजयी झाले. आता भाजपाचा गटनेता म्हणून किरण सावरकर यांची नियुक्ती झाली. काँग्रेसनेसुद्धा वेगळा गट स्थापन केला.होता. पण काँग्रेसच्या गटाने आमचा गट रद्द करण्याचे पत्र ५ जानेवारीला जिल्हाधिकाऱ्यांना दिले. त्यानुसार काँग्रेसचा गट रद्द होऊन १० तारखेला हा गट भाजपमध्ये विलीन केला, असे पत्र भाजपा गटनेत्याने काँग्रेसला दिले आहे. काँग्रेसच्या गटात मो. निसार, भाग्यश्री अधव असून ते आता भाजपाच्या गटात विलीन झाले असून काँग्रेसला त्यांनी धक्का दिलेला आहे. आता वरुडमध्ये काँग्रेचे अस्तित्व राहिलेले दिसत नाही.

# महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावतीत गुन्हेशाखेची धडक कारवाई

### कोबींग ऑपरेशनमध्ये ५ गुन्हे उघड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२अमरावती–** आगामी अमरावती महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमी वर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्या साठी अमरावती शहर गुन्हेशाखे च्या वतीने विशेष कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. दिनांक १० जानेवारी ते ११ जानेवारी २०२६ दरम्यान राबविण्यात आलेल्या या मोहिमेत अमली पदार्थ विक्री, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरी तसेच अवैध दारू निर्मिती व विक्रीप्रकरणी एकूण पाच धडक कारवाया करण्यात आल्या.

गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरीप्रकरणी १९ वर्षीय तेजस दिवाकर माथुरकर याला ताब्यात घेऊन गुन्हा उघडकीस आणण्यात आला. तसेच गुप्त माहितीच्या आधारे गांजाची विक्री करणाऱ्या विरेंद्र विजय किर्तक याच्याकडून १.०८० किलो गांजा, अंदाजे २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

याच परिसरात एका विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून लोखंडी तलवार जप्त करण्यात आली, तर जिल्हाधिकारी कार्यालय चौकात संशया स्पदरीत्या फिरणाऱ्या वरद उर्फ टक्या आनंद तांबेकर याच्याकडून लोखंडी कोयता जप्त करून आर्म क्ट अंतर्गत कारवाई करण्यात आली.फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सरदारपुरा, वडाळी येथे अजीत कौर अवतारसिंग टाक हिच्या घराच्या आवारात सुरू असलेली गावठी दारू निर्मिती उघडकीस आली. यावेळी ५० लिटर हातभट्टी दारू, २०० लिटर रसायन व इतर साहित्य असा सुमारे ८२ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखेच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. निवडणूक काळात अशाच कडक कारवाया सुरू राहणार असल्याचा इशाराही पोलिसांकडून देण्यात आला आहे.

# अकोला-बडनेरा रस्त्यावर कारवाई

# १३.८०० ग्रॅम एमडी ड्रग्जसह दोघांना अटक

## ८.२२ लाख रुपयांचा माल जप्त

### अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती :**

अकोला-बडनेरा रस्त्यावरील उड्डाण पुलाजवळ १३.८०० ग्रॅम एमडी ड्रग्जसह दोन आरोपींना अटक करण्यात आली. या कारवाईत विशेष अंमली पदार्थ पथकाने ८ लाख २२ हजार रुपयांचा माल जप्त केला. दोन्ही आरोपींविरुद्ध बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात असून चौकशी सुरू आहे. माहितीनुसार, एएनटीएफ पथक शनिवारी रात्री गस्त घालत होते. दोन व्यक्ती महिद्रा कारमध्ये एमडी ड्रग्ज घेऊन जात असल्याचे समजले. माहिती मिळताच, एनटीएफ पथकाने बडनेरा-अकोला महामार्गावरील उड्डाणपुलाजवळ सापळा रचला. अकोल्याहून बडनेराकडे सर्व्हिस रोडवर जाणाऱ्या एका संशयास्पद कारला थांबवून त्याची झडती घेण्यात आली. गाडीत साहिल उर्फ विवेक अशोक मते (२६, अशोक नगर, नवी वस्ती, बडनेरा) आणि अक्षय गजानन चर्जन (२७, शिवनी, भातकुली) हे दोनसंशयित आढळले. झडतीदरम्यान साहिलकडून १३.८०० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले. दोन्ही आरोपींना त्यांच्या मोबाईल फोन आणि कारसह ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ८ लाख २२ हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. आरोपींविरुद्धबडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक अजित टिके यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलिस उपअधीक्षक गजानन विखे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक समाधानमचाळे, पूनम जगताप, विनय मोहोड, दीपक श्रीवास, शैलेंद्र अर्डक, सुमेधबोधी पोहेकर, नीलेश येरणे, रियाज अहमद, विनोद भगत यांनी केली. पुढील तपास सुरु आहे.






# भरदिवसा १७ वर्षीय तरुणाची चाकूने भोसकून हत्या

## प्रेम प्रकरणाच्या विवादातून घडले हत्याकांड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती**

शहरातीलगांधी आश्रम चौक संकुलात रविवारला दुपारी एक धक्कादायक, थरारक घटना घडली. जुन्या प्रेम प्रकरणाच्या वादातून १७ वर्षीय तरुणाची निघृणपणे चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. मृताचे नाव नयन नरेंद्र वायधने (१७) असे आहे. पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये तीन महिलांचा समावेश आहे. मुख्य हल्लेखोर दीपक तायडे आणि सागर तायडे फरार असल्याचे वृत्त आहे. वृत्तानुसार, खोलापुरी गेट पोलिस स्टेशन परिसरातील रहिवासी नयन वायधने हा त्याच्या मित्रासह मोटारसायकल वरून गांधी आश्रम चौकातून जात होता. आरोपी दीपक ईश्वर तायडे (४०) आणि त्याचा भाऊ सागर ईश्वर तायडे (३५) हे तीन महिलांसह आले आणि त्यांनी नयनची मोटारसायकल थांबवली. असा आरोप आहे की दीपक आणि सागर यांनी नयनचे त्यांच्या भाचीशी असलेल्या पूर्वीच्या प्रेमसंबंधावरून वादघातला आणि त्यांनी नयनवर चाकूने हल्ला केला. नयनच्या पाठीवर, कंबरेवर डाव्या बाजूला, डाव्या मांडीवर आणि डोक्यावर गंभीर वार करण्यात आले. त्यामुळे रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला. घटनेची माहिती मिळताच त्याचा मित्र रोहन घटनास्थळी पोहोचला आणि त्याने नयनला ताबडतोब मोटारसायकलवरून इर्विन रुग्णालयात नेले. तथापि, तपासणीनंतर डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.



### सीपी, डीसीपी घटनास्थळी पोहोचले

गांधी आश्रमाजवळील हत्येची माहिती मिळताच, पोलीस आयुक्त राकेश ओला, डीसीपी गणेश शिंदे, शाम घुगे, एसीपी शिवाजी बचाटे आणि गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चौहान त्यांच्या कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी पोहोचले. फरार आरोपींचा शोध घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

# धामणगाव रेल्वे परिसरात भूकंपाचा सौम्य धक्का

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२ धामणगाव रेल्वे**




धामणगाव रेल्वे येथील कृष्णानगर व आसपासच्या काही भागांमध्ये आज भूकंपाचा सौम्य धक्का जाणवल्याची माहिती समोर आली आहे. अचानक घर हलल्यासारखे वाटल्याने अनेक नागरिक काही क्षणांसाठी घाबरले. हा धक्का अल्पकालीन असल्याचे नागरिकांनी सांगितले. घटनेनंतर परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या घटनेत कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झालेली नाही. अनेक नागरिकांनी भूकंपासारखे धक्के जाणवल्याचे सांगितले असले, तरी परिस्थिती लवकरच पूर्ववत झाली. प्रशासनाकडूनही कोणत्याही प्रकारच्या नुकसानाची नोंद झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या संदर्भात प्रतिक्रिया देताना सामाजिक कार्यकर्ते अक्षय जोशी यांनी सांगितले, हा भूकंपाचा सौम्य व क्षणिक धक्का होता. नागरिकांनी घाबरून जाऊ नये. कृष्णा नगर येथील एका रहिवाशाने सांगितले, क्षणभर घर हलल्यासारखे वाटले आणि आम्ही घाबरलो, पण काही नुकसान झालेले नाही.

**भारतीय भूगर्भशास्त्रीय सर्वेक्षण विभागातील वेधशाळेच्या जीपीएस, सेस्मोग्राफवर भूकंप झाल्याची नोंद नाही. घडलेली घटना इतर कारणांनी होऊ शकते. त्यामुळे सदर विषयात घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये.**
**अभय घोरपडे, तहसीलदार**

# जि.प. क्रीडा महोत्सवात धारणी तालुका ठरला सर्वोत्कृष्ट

## सांस्कृतिकमध्ये मोर्शी, निदर्शनांमध्ये अंजनगाव पंचायत समितीने पटकावले अव्वल स्थान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती–** अमरावती येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात धारणी तालुक्याने सर्वोत्कृष्ट सादरीकरण करत प्रथम पुरस्कार पटकावला आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मोर्शी पंचायत समितीने, तर निदर्शनांमध्ये अंजनगाव सुर्जी पंचायत समितीने अव्वल स्थान प्राप्त केले.

श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित तीन दिवसीय जिल्हास्तरीय शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचा शनिवारी समारोप झाला. यावेळी तिन्ही विजेत्यांना गौरवून पुरस्कृत करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सतीश मुगल, उपशिक्षणाधिकारी गंगाधर मोहने व रजनी शिरभाते, ओपन लिंक फाउंडेशनच्या (ओएलएफ) राज्य समन्वयक चित्रा खन्ना, विस्तार अधिकारी संगीता सोनोने तसेच जिल्ह्यातील बहुतेक पंचायत समित्यांचे गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. या जिल्हास्तरीय शालेय क्रीडा महोत्सवात धारणीच्या खेळाडूंनी प्राथमिक विभागात कबड्डी (मुली), लंगडी (मुली) आणि खो-खो (मुली) मध्ये अजिंक्यपद मिळवले. तसेच, माध्यमिक विभागाच्या क्रीडा स्पर्धांमध्ये कबड्डी (मुली) आणि खो-खो (मुले-मुली) मध्येही धारणीच्या विद्यार्थ्यांनी अव्वल यश संपादन केले. वैयक्तिक खेळांमध्येही धारणीच्या विद्यार्थ्यांनी शंभर मीटर धावणे, उंच उडी, गोळा फेक यांसारख्या स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी केली.सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मोर्शीच्या विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणातून उत्कृष्ट कामगिरी बजावली. तर निदर्शनांमध्ये अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विद्यार्थ्यांनी चमकदार प्रदर्शन केले. त्यामुळे या दोन्ही तालुक्यांना त्यांच्या संबंधित प्रकारात प्रथमांक देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी सतीश मुगल यांनी केले. मनीष काळे यांनी सूत्रसंचालन केले, तर क्रीडा संयोजक प्रवीण खांडेकर यांनी आभार मानले. यावेळी प्रसिद्धी समितीचे विनोद गाढे, विनायक लकडे, राजेश सावरकर, शकील अहमद, श्रीनाथ वानखडे, हेमंतकुमार यावले, पूनम उके आदी उपस्थित होते.



# भाजपची 'बेटी बचाओ' फक्त घोषणाच

## माजी मंत्री यशोमती ठाकूर यांची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती–**
बदलापूर येथील एका शाळेत लहान मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणातील सहआरोपी तुषार आपटे याची भाजपने स्वीकृत नगरसेवकपदी नियुक्ती केल्याने राजकीय वातावरण पेटले आहे. काँग्रेसच्या नेत्या माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी या प्रकरणात भाजपवर जोरदार टीका केली आहे.बदलापूर बालिका अत्याचार प्रकरणातील सहआरोपी तुषार आपटेला भाजपकडून स्वीकृत नगरसेवकपदाची बक्षिसी देणे म्हणजे आश्चर्यच आहे. बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरचा मागील निवडणुकीत राजकीय प्रचारासाठी वापर केला. पण आपटेला या प्रकरणात न वाचविण्यासाठी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर केला गेला का मग?, असा सवाल यशोमती ठाकूर यांनी केला आहे. भाजपची 'बेटी बचाओ' फक्त घोषणाच उरली आहे, प्रत्यक्षात भाजप 'गुन्हेगार बचाव' मोहिमेवर आहे. महाराष्ट्राच्या लेकी हे विसरणार नाही, अशी टीका यशोमती ठाकूर यांनी केली आहे.



# राष्ट्रीय महामार्गावर 'गुरुकुंज मोझरी'चा उल्लेख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ गुरुकुंजमोझरी**

राष्ट्रीय महामार्गावरील मुख्य दिशादर्शक फलकावर 'गुरुकुंज मोझरी' या पवित्र व ऐतिहासिक स्थळाचा उल्लेख करण्यात यावा, या मागणीसाठी प्रहार संघटनेच्या वतीने छेडण्यात आलेल्या डेरा आंदोलनाला अखेर यश मिळाले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिलेल्या लेखी आदेशानंतर फलकावर गुरुकुंज मोझरीचे नाव स्पष्टपणे लावण्यात आले असून, त्यामुळे प्रवासी, भाविक तसेच स्थानिक नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. यापूर्वी दिशादर्शक फलकावर मोझरी/गुरुकुंज मोझरीचा उल्लेख नसल्याने बाहेरून येणार्या भाविकांमध्ये व वाहन चालकांमध्ये मोठ्या प्रमाणात नावाचा व दिशेचा गोंधळ निर्माण होत होता. परिणामी एस.टी. महामंडळाच्या बसेस, खासगी वाहने तसेच दर्शनासाठी येणार्या भाविकांना अनावश्यक फेर्या माराव्या लागत होत्या. आता मात्र फलकावर स्पष्टपणे 'गुरुकुंज मोझरी' असा उल्लेख झाल्याने हा संभ्रम पूर्णतः दूर झाला असून प्रवास अधिक सुलभ व सुरक्षित झाला आहे.



प्रहार संघटनेच्या ठाम भूमिकेमुळे आणि एनएचएआय कार्यालयात करण्यात आलेल्या ठिय्या व डेरा आंदोलनामुळे प्रशासनाला तातडीने निर्णय घ्यावा लागला. महाप्रबंधकांकडून लेखी आदेश मिळताच संबंधित कामाला गती देण्यात आली. यामुळे केवळ प्रहार कार्यकर्त्यांमध्येच नव्हे तर सर्वसामान्य प्रवासी, भाविक, विद्यार्थी व वाहनचालकांमध्येही दिलासा आणि समाधान व्यक्त होत आहे. प्रहार संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, हे आंदोलन केवळ एका नावापुरते मर्यादित नव्हते, तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कर्मभूमीचा योग्य सन्मान राखण्यासाठी आणि लाखो भाविकांच्या सोयीसाठी करण्यात आले होते. आंदोलनाच्या यशानंतर प्रहार संघटना तसेच प्रवाशांच्या वतीने समाधान व्यक्त करण्यात आले असून, भविष्यातही जनहिताच्या प्रश्नांसाठी अशीच ठाम भूमिका घेतली जाईल, असा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

# संक्रांतीला खरेदीसाठी महिलांची गर्दी

## यंदाही साहित्याच्या किंमती वाढल्या, वाणाच्या विविध वस्तूंनी दुकाने सजरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२ अमरावती–**
मकरसंक्रांत सणाच्या खरेदीसाठी शनिवारी १० जानेवारीला महिलांनी बाजारपेठेत गर्दी केली होती. सुटीची पर्वणी साधत तीळगुळ, हळदी कुंकवाच्या वस्तूंसह वाण खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी झाली होती.मात्र, यंदाही साहित्याच्या किंमती वाढल्याने वस्तू खरेदीसाठी महिलांनी हात आखडता घेतला आहे. बुधवारी १४ जानेवारीला मकरसंक्रांत आहे. त्या निमित्ताने रविवारी सुटीचा मुहूर्त साधत महिलांसह तरुणींची बाजारपेठेत गर्दी होणार आहे. बाजारातील रेडिमेड तीळगुळ, तिळाचे लाडू, चिक्की, गुळाची रेवडी, साखरफुटाणे खरेदीला यंदाही प्राधान्य देण्यात आले. संक्रांतीला हलव्याच्या दागिन्यांमध्ये मुकुट, बाजूबंद, अंगठी, झुमके वेल, झुमके, गजरे, मोहनमाळ, सुट्टे तनमणी, मंगळसूत्र, बांगडी, घड्याळ, नथ, छल्ला, हार, फुलगुच्छ, नेकलेस, अशा दागिन्यांना महिलांनी पसंती दिली. हळदी कुंकवाचे वाण खरेदीसाठी आकर्षक वस्तू खरेदी करण्यासाठी महिलांची गर्दी अधिक होती. महिलांसाठी वर्षातील सर्वात मोठा व आनंदाचा सण म्हणून मकर संक्रातीचा सण ओळखला जातो. या सणाला तीळगुळ द्या, गोड गोड बोला, असे म्हणत मकर संक्रातीचा सण साजरा केला जातो. शहरातील बाजारात तीळगुळासह विविध वस्तू विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. मात्र, यंदाही तीळगुळाचे भाव वाढले आहेत. अतिवृष्टीमुळे स्थानिक तीळाचे आवश्यक उत्पन्न मिळाले नाही. यामुळे तीळाचे भावही वाढले आहे. सध्या बाजारात रेडिमेड तीळगुळ १२० ते १६० रुपये प्रति किलोने मिळत आहे. गुळाच्या रेवडीची किंमत १५० रुपये किलो आहे. मात्र, संक्रातीला तिळाला अन्यसाधारण महत्व आहे. तसेच तीळगुळ आरोग्यासाठी सर्वात लाभदायक आहे. सध्या बाजारात तिळाचे भाव १६० ते २०० रुपये प्रति किलो असून, गुळ ४५ ते ८० रुपये किलो आहे.

साहित्य खरेदीला वेग मकर संक्रातीसाठी अनेक महिला एक महिन्यापासून तयारीला लागतात. साडी, रांगोळी चे डिझाइन तयार करणे, लुटण्यासाठी कोणती वस्तू ठेवायची, हळदी कुंकु, सुगड यासह इतर साहित्याचे नियोजन केले जाते. खरेदीसाठी तीन दिवस असल्याने शनिवारी महिलांनी खरेदीसाठी गर्दी केली होती.



# सातला बंद होतात मोबाईल व टीव्ही!

## पिंपळखुटा ग्रामवासीयांचे प्रेरणादायी उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२वरुड** गावातील मुलं शिकली पाहिजे या उद्दात्त हेतूने सरपंचाच्या संकल्पनेतून तालुक्यातील पिंपळखुटा गावाने शिक्षणाच्या क्षेत्रात एक प्रेरणादायी पाऊल उचलले आहे. सायंकाळी ७ वाजता सायरनचा भोंगा वाजवून मोबाइल, टीव्ही बंद करून अभ्यासाला लागण्याची सूचना ग्रामस्थांना दिली जाते.

मोबाईल, टीव्हीच्या नादात भरकटलेल्या विद्यार्थ्यांना अभ्यासाची दिशा देण्यासाठी पिंपळखुटा ग्रामवासीयांनी दररोज सायंकाळी ७ वाजता मोबाईल आणि टीव्ही बंद करून सर्व मुलांना अभ्यासाला बसवण्याचा सामूहिक निर्णय घेतला आहे. हा उपक्रम रात्री नऊ वाजेपर्यंत केवळ दोन तास राबविला जातो. अभ्यासाचा भोंगा या प्रेरणादायी उपक्रमाची सुरुवात ग्रामपंचायतीच्या पुढाकारातून गावचे सरपंच गजानन पडोळे, उपसरपंच, सदस्य तसेच शिक्षक यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. पिंपळखुटा गाव अमरावती जिल्ह्यासाठी आदर्श ठरत आहेत. या उपक्रमामुळे गावातील मुला-मुलींमध्ये शिस्त, एकाग्रता व अभ्यासाची ओढ निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले. अभ्यासाचा भोंगा या अनोख्या उपक्रमाची गटविकास अधिकारी सुभाष पिल्लारे, विस्तार अधिकारी नितीन सुपलेसह पंचायत समिती शिक्षण विभागाच्या पथकाने तपासणी केली असता रात्री नियोजित दोन तासात घराघरांत मुलं-मुली अभ्यासात व्यस्त दिसून आले.पिंपळखुटा गावात रात्री ७ ते ९ या दोन तासात विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा, उच्च विद्याविभूषित व्हावे, या उद्देशाने गावातील विद्युत खांबावर भोंगा लावून त्यामध्ये सायरन वाजवून ग्रामपंचायती मधून सूचना दिल्या जाते. वेळीच सर्व ग्रामस्थ मोबाईल, टीव्ही बंद करून मुलांना अभ्यासाला बसवितात. त्यामुळे हा उपक्रम कौतुकास्पद ठरत आहे. मोबाईल, टीव्हीला बाजूला ठेवून ज्ञानाला प्राधान्य देणार्या या उपक्रमामुळे गावातील मुलांच्या उज्ज्वल भवितव्याचा पाया मजबूत होणार आहे.



# अपघाती मृत्यूच्या घटनेनंतर बेशिस्त वाहनांवर दर्यापूर पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२दर्यापूर–** उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी व ठाणेदार सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी दर्यापूर पोलिसांनी अकोट-दर्यापूर मार्गावर वाहतूक नियंत्रण व रस्ते सुरक्षा मोहीम राबवली आहे. शुक्रवारी याच मार्गावर अवैध व बेशिस्त ऑटोमुळे अनियंत्रित होऊन दुचाकी चालक प्राचार्याचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान पोलीस प्रशासन अधिक सतर्क झाले असून भविष्यात असे दुर्दैवी अपघात घडू नयेत, यासाठी ही कारवाईची मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत रस्त्यावर वाहतुकीला अडथळा ठरणारी वाहने हटवून संपूर्ण मार्ग मोकळा करण्यात आला.मुख्य रस्त्यावर बेवारस, बेशिस्त व चुकीच्या पद्धतीने उभी असलेली वाहने पोलीसांकडून हटवण्यात आली.तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक दंडात्मक कारवाई करण्यात आली. हेल्मेट न घालणे, चुकीच्या बाजूने वाहन चालवणे, रस्त्यावर

### अकोट-दर्यापूर मार्गावर रस्ते सुरक्षेसाठी मोहीम

वाहन उभे करून अडथळा निर्माण करणे, तसेच वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर दंड आकारण्यात आला. पुढील काळातही नियम न पाळणाऱ्या नागरिकांवर अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे यामुळे वाहनचालक व नागरिकांनी थोडे समाधान व्यक्त केले आहे.



वाहतूक नियमांचे काटेकोर पालन अनिवार्य वाहन चालकांनी व नागरिकांनी नियमाचे काटेकोर पालन करणे महत्त्वाचे आहे. अति घाई संकटात नेई याप्रमाणे रस्त्याचे नियम पाळणे नागरिक हिताचे मानले जाते. तसेच पोलीस प्रशासनाला सुद्धा सुजान नागरिक म्हणून सहकार्य करणे महत्वाचे असून यापुढेही पोलीस प्रशासनाची कारवाई व खाकीचा धाक असणे महत्त्वाचे आहे,अशी प्रतिक्रीया ॲड. अनुप गोमाशे यांनी दिली.

# भाजप उमेदवारांसाठी माजी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांचा झंझावाती प्रचार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

येत्या २०२६ च्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा विजय निश्चित करण्यासाठी माजी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांनी संपूर्ण ताकदीनिशी प्रचाराला सुरुवात केली आहे. शहरातील सर्व प्रभागांमध्ये भाजप उमेदवारांच्या प्रचारासाठी ते सकाळपासून रात्री उशिरापर्यंत सक्रिय असून, त्यांचा प्रचार दौरा अक्षरशः झंझावाती ठरत आहे.दररोज पहाटे पूजा-पाठाचा नित्यक्रम आटोपून प्रवीण पोटे पाटील प्रचारासाठी घराबाहेर पडतात. त्यानंतर दिवसभर विविध प्रभागांमध्ये महत्त्वाच्या नागरिकांशी बैठका, कॉर्नर मीटिंग्स तसेच मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. रात्री उशिरापर्यंत बैठका, प्रचार फेऱ्या आणि कार्यकर्त्यांशी चर्चा सुरू असते. प्रत्येक प्रभागात भाजपचा संदेश पोहोचवण्यासाठी ते स्वतः पुढाकार घेत आहेत.प्रचारादरम्यान प्रवीण पोटे पाटील अमरावती शहराच्या विकासासाठी भाजपचा स्पष्ट आणि दूरदृष्टीपूर्ण व्हिजन नागरिकांसमोर मांडत आहेत. शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य व शिक्षण यासोबतच औद्योगिक विकासावर भाजपचा विशेष भर असल्याचे ते अधोरेखित करत आहेत. अमरावतीत रोजगाराच्या संधी वाढाव्यात यासाठी आयटी पार्कसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांचीही माहिती ते देत आहेत. त्यामुळे तरुणांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.प्रत्येक प्रभागातून भाजपचे उमेदवार निवडून द्या, शहराच्या विकासाला गती द्या, असे आवाहन ते सातत्याने मतदारांना करत आहेत. त्यांच्या प्रचाराला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, अनेक ठिकाणी त्यांचे जंगी स्वागत होत आहे. लोकांमध्ये प्रवीण पोटे पाटील यांच्याबद्दल विश्वास आणि आपुलकी दिसून येत आहे.या प्रचार मोहिमेदरम्यान खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार राजेश बकाने, आमदार प्रवीण तायडे, जयंत डेहनकर, शिवराय कुलकर्णी, नितीन गुडधे आदी नेते व पदाधिकारी उपस्थित राहून प्रचाराला बळ देत आहेत. सर्व नेते, कार्यकर्ते आणि उमेदवार एकत्र येऊन भाजप - विकासाचा विश्वास हा संदेश घराघरात पोहोचवत आहेत.एकूणच, अमरावती महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी पालकमंत्री प्रवीण पोटे पाटील यांचा हा जोरदार प्रचार भाजपसाठी निर्णायक ठरण्याची चिन्हे दिसत असून, शहरात निवडणुकीची रंगत दिवसेंदिवस वाढत चालली आहे.

# अमरावतीतील १८ प्रभागांमध्ये 'काट्याची' लढत माजी महापौरांसह दिग्गज मैदानात; मनपा निवडणूक रंगतदार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १२अमरावती**




येत्या अमरावती महानगरपालिका निवडणुकीकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले असून, सर्वच राजकीय पक्षांनी ही निवडणूक प्रतिष्ठेची बनवली आहे. सत्तेवर दावा सांगण्यासाठी प्रत्येक पक्षाने ताकदवान व प्रभावी उमेदवार मैदानात उतरवले आहेत. त्यामुळे महापालिकेच्या एकूण २२ प्रभागांपैकी तब्बल १८ प्रभागांमध्ये अत्यंत चुरशीची, म्हणजेच 'काट्याची' लढत होण्याची शक्यता राजकीय जाणकार व्यक्त करत आहेत.या निवडणुकीत अनेक प्रभागांमध्ये माजी नगरसेवक, माजी महापौर, अनुभवी पदाधिकारी तसेच नवोदित युवा नेते आमने-सामने उभे ठाकले आहेत. काही प्रभागांमध्ये तर दोन-दोन माजी नगरसेवकांमध्ये थेट सामना होत असल्याने वातावरण अधिकच तापले आहे. तर काही ठिकाणी पक्षांनी तरुण उमेदवारांना संधी देत अनुभवी नेत्यांना आव्हान दिले आहे.उमेदवारांच्या प्रचारासाठी आमदार, खासदार तसेच विविध पक्षांचे स्टार प्रचारक मैदानात उतरले आहेत. त्यामुळे प्रचाराला अधिकच वेग आला असून, प्रत्येक प्रभागात सभा, कॉर्नर मीटिंग्स, पदयात्रा, घरभेटी यांचा धडाका सुरू आहे.आमदार, पदाधिकाऱ्यांचे नातेवाईकही रिंगणातअमरावती मनपा निवडणुकीत एकूण ६६१ उमेदवार रिंगणात आहेत. २२ प्रभागांतून ८७ सदस्य निवडण्यासाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत अनेक राजकीय नेत्यांचे नातेवाईकही उमेदवार म्हणून उभे असल्याने चर्चा रंगली आहे. भाजपचे विधानपरिषद आमदार श्रीकांत भारतीय यांचे बंधू तुषार भारतीय हे साईनगर प्रभागातून निवडणूक लढवत आहेत. भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष दिनेश सूर्यवंशी यांच्या पत्नी स्मिता सूर्यवंशी या स्वामी विवेकानंद कॉलनी प्रभागातून भाजपच्या उमेदवार आहेत. याशिवाय इतरही अनेक पक्षांतील स्थानिक नेत्यांचे नातेवाईक विविध प्रभागांतून निवडणूक रिंगणात उतरले आहेत.पहिल्यांदाच राजकारणात उतरणारेही सक्षममहापालिकेच्या रणांगणात उतरलेल्या अनेक उमेदवारांनी यंदा पहिल्यांदाच राजकारणात पाऊल टाकले आहे. मात्र, त्यांची तयारी आणि प्रचाराची पद्धत पाहता ते अनुभवी नेते व कार्यकर्त्यांना चांगलेच टक्कर देताना दिसत आहेत. त्यामुळे अनेक प्रभागांमध्ये निकाल शेवटच्या क्षणापर्यंत अनिश्चित राहण्याची शक्यता आहे.प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात चुरसआता प्रचारासाठी अवघे दोन दिवस शिल्लक राहिल्याने सर्वच पक्ष आणि उमेदवारांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. फोनाफोनी, वैयक्तिक संपर्क, प्रभावशाली व्यक्तींशी चर्चा अशा सर्व मार्गांचा वापर केला जात आहे. समर्थक आपल्या-आपल्या भागातील प्रभावी नागरिकांना थेट फोन करून उमेदवाराच्या विजयासाठी मदतीची विनंती करत आहेत.राजकीय जाणकारांच्या मते, पुढील दोन-तीन दिवसांत वातावरण व समीकरणे कोणत्याही क्षणी बदलू शकतात. काही प्रभागांमध्ये पक्षांतर केलेले नेते एकमेकांविरोधात उभे ठाकल्याचे चित्र आहे.काही प्रभागांतील लक्षवेधी लढतीअमरावती मनपा निवडणुकीतील काही प्रभागांमध्ये विशेष लक्षवेधी सामने होत आहेत. प्रभाग क्रमांक १४ मध्ये उबाठा सेनेचे माजी नगरसेवक प्रवीण हरमकर आणि त्यांची पत्नी विशाखा हरमकर हे दोघेही निवडणूक लढवत आहेत. अमरावतीत पती-पत्नी एकाच वेळी निवडणूक लढवत असलेले हे एकमेव उदाहरण ठरत आहे.प्रभाग क्रमांक २, १०, १३, १४, १५, १८, १९, २०, २२ आदी प्रभागांमध्ये भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी (अजित पवार), उबाठा सेना, शिंदे सेना, रिपाइं (आठवले), युवा स्वाभिमान, वंचित बहुजन आघाडी, बसपा अशा विविध पक्षांचे दिग्गज उमेदवार एकमेकांसमोर उभे आहेत.एकूणच, अमरावती महानगरपालिका निवडणूक यंदा अत्यंत रोचक, चुरशीची आणि अनिश्चित निकालांची ठरणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. १८ प्रभागांतील दिग्गज उमेदवारांमुळे ही निवडणूक शहराच्या राजकारणात नवा इतिहास रचणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुन्हा शेतकरी आत्महत्यांचे धक्कादायक वास्तव समोर; अमरावतीत वर्षभरात २०१ बळी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांचे सत्र अडीच दशकांत थांबलेले नाही, तर यामध्ये वाढ होत आहे. सन २००१ पासून शेतकरी आत्महत्यांची नोंद शासनस्तरावरून घेतली जाते. त्यानुसार जिल्ह्यात ५५७७ तर सन २०२५ मध्ये २०१ शेतकरी अस्मानी व सुल्तानी संकटाचे बळी ठरले आहेत. यामध्ये मे महिन्यात सर्वात कमी ९ तर मेमध्ये सर्वाधिक २७ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत.



राज्यात कोणत्याही राजकीय पक्षाची सत्ता असली तरी शासन-प्रशासन शेतकरी आत्महत्या विषयात गंभीर नसल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे. केवळ कर्जबाजारीपणामुळे नव्हे तर अन्य कारणांमुळेही शेतकरी मृत्यूचा फास ओढत आहे. यापूर्वी महाडीबीटीमुळे गरजू शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांचा लाभ मिळालेला नाही. शेतकरी आत्महत्याप्रवण जिल्ह्यासाठी शासनाने राबविलेले प्रकल्प पांढरा हत्ती ठरले आहे. शेतकरी मिशनही विंवचनेतील शेतकऱ्यांना न्याय देऊ शकलेला नसल्याचे वास्तव आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्याचे सत्र सुरूच असल्याचे वास्तव आहे.

केवळ सन २००१ पासून जिल्ह्यात ५,५७७ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहे. यामध्ये शासन मदतीसाठी २९४४ प्रकरणे पात्र ठरली आहेत तर २५६८ प्रकरणे अपात्र आहेत. २९२९ प्रकरणात शासन मदत देण्यात आलेली आहे. याशिवाय ६५ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहे.

**विभागात ३६५ दिवसांत १०४० शेतकरी आत्महत्या**

राज्यात वर्षभरात सर्वाधिक १०४० शेतकरी आत्महत्या अमरावती विभागात झालेल्या आहेत. दर आठ तासांत एक शेतकरी मृत्यूचा फास ओढत आहे. यामध्ये सर्वाधिक ३६४ शेतकरी आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात झालेल्या आहेत. किंबहुना राज्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या या जिल्ह्यात झाल्या आहेत.नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ, नापिकी, बँकांचे व खासगी सावकाराचे कर्ज, कर्जवसुलीस तगादा, मुलींचे लग्न, आजारपण आदी.

**सन २०२० पासून आत्महत्या**

सन २०२० - २९५
सन २०२१ - ३७०
सन २०२२ - ३४९
सन २०२३ - ३२६
सन २०२४ - २००
सन २०२५ - २०१

**वर्षभरात फक्त ६० प्रकरणात शासन मदत**

सन २०२५ मध्ये जिल्ह्यात २०१ शेतकऱ्यांनी मृत्यूचा फास ओढला आहे. यामध्ये ७५ प्रकरणे शासन मदतीसाठी पात्र ठरविण्यात आली तर ६१ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. याशिवाय फक्त ६० प्रकरणांत शासन मदत देण्यात आलेली आहे. तर नऊ महिन्यांपासून ६५ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत. त्यामुळे आता या प्रलंबीत प्रकरणाचा निपटारा केव्हा होणार हा खरा प्रश्न

# धामणगाव नगरपरिषदेत डॉ. पसारी, ॲड. व्यास स्वीकृत सदस्यपदी

## प्रथमच वैद्यकीय व विधी क्षेत्रातील सदस्यांना संधी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२धामणगाव रेल्वे**

स्थानिक नगरपरिषदेमध्ये वकील व डॉक्टरांना स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले असून, त्यामध्ये ॲड. रिना मनोज व्यास व डॉ. असीतकुमार पसारी यांची वर्णी लागली आहे.

नगराध्यक्ष अर्चना अडसड (रोठे) व आ. प्रताप अडसड यांच्या नेतृत्वात ही निवड करण्यात आली. चांदुर रेल्वे नगरपरिषदेमध्ये भाजपाचे ११ सदस्य निवडून आले आहे. येथील स्वीकृत सदस्य म्हणून डॉ. सुभाष पणपालिया यांचीही नियुक्ती झाली आहे.महिला वकील व डॉक्टर यांना स्वीकृत सदस्यपदी बहुमान देणारी धामणगाव रेल्वे ही कदाचित जिल्ह्यातील पहिलीच नगरपरिषद असल्याचे नगरपरिषद प्रशासनातील सहाय्यक आयुक्त विकास खंडारे यांनी सांगितले.

# अमरावती-पुणे-अमरावती एक्सप्रेस तीन दिवस राहणार रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

मध्य रेल्वेच्या पुणे विभागांतर्गत येणाऱ्या दौंड-मनमाड विभागातील दौंड आणि काष्टी स्थानकांदरम्यान रेल्वे मार्ग दुहेरीकरणांतर्गत प्री-नॉन इंटर लॉकिंग (प्री-एनआय) आणि नॉन-इंटरलॉकिंग (एनआय) कामासाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेतला जात आहे. त्यामुळे २३ ते २५ जानेवारीला अमरावती-पुणे-अमरावती या सर्वच एक्सप्रेस गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच काही गाड्यांचे मार्ग परिवर्तन करण्यात आले असून काही गाड्यांची वेळ पुर्ननिर्धारित करण्यात आली आहे.

गाडी क्र. ११०२५ पुणे-अमरावती एक्सप्रेस २४ व २५ रोजी तर गाडी क्र. ११०२६ अमरावती-पुणे एक्सप्रेस २३ व २४ जानेवारी रोजी रद्द करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे साप्ताहिक गाडी क्र.१२१२० अमरावती-पुणे एक्सप्रेस २५ रोजी रद्द करण्यात आली आहे. बडनेरा स्थानकावरून पुणे येथून नागपूरकरव नागपूरकडून पुण्याकडे जाणाऱ्या गाडी क्र. १२११३ पुणे-नागपूर गरीब रथ एक्सप्रेस २४ रोजी, गाडी क्र.१२११४ नागपूर-पुणे गरीब रथ एक्सप्रेस २३ रोजी रद्द झाली आहे. गाडी क्र. २२१३९ पुणे-अजनी हमसफर एक्सप्रेस २४ रोजी, गाडी क्र.२२९४० अजनी-पुणे हमसफर एक्सप्रेस २५ रोजी, गाडी क्र.१२१३६ नागपूर-पुणे एक्सप्रेस २४ रोजी, गाडी क्र.१२१३५ पुणे-नागपूर एक्सप्रेस २५ रोजी रद्द करण्यात आली आहे.



## गाड्यांच्या वेळेत झाला काहीसा बदल

गाडी क्रमांक २२८४५ पुणे-हाटिया एक्सप्रेस १२ जानेवारी रोजी २ तास १० मिनिटांनी आणि १८, २१ जानेवारी रोजी २ तासांनी उशिराने सुटेल.त्यामुळे बडनेरा स्टेशनवर ही एक्सप्रेस तिच्या निर्धारित वेळेत अर्थात रात्री ११.५७ऐवजी रात्री १.५७ वाजता पोहोचेल. सध्या थंडी व धुक्यामुळे रेल्वे गाड्या उशिरा धावत असल्यामुळे या गाडीने प्रवासाच्या दिवशी प्रवाशांनी वेळेची खात्री करूनच स्टेशनवर पोहोचणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे गाडी क्र. ११४०६ अमरावती-पुणे साप्ताहिक एक्सप्रेस २४ जानेवारी रोजी ०२ तास ३० मिनिटांनी उशिरा धावणार आहे. रेल्वे प्रवाशांनी याची नोंद घ्यावी.

## प्रवाशांची सुटीच्या कालावधीत गैरसोय

अमरावती जिल्हयातील मोठ्या संख्येत चाकरमाने, विद्यार्थी, प्रवासी अमरावती व बडनेरा स्टेशनवरून अमरावती-पुणे-अमरावती असे जाणे-येणे करीत असतात. सलग दोन ते तीन दिवस सुट्या आल्या की, अनेकजण गृह नगरात येतात. यंदा राष्ट्रीय उत्सव गणराज्य दिन २६ जानेवारी सोमवारी आला आहे. तत्पूर्वी २४ रोजी शनिवार व २५ रोजी रविवारची सुटी आली आहे.या तिन्ही सुट्यांचा लाभघेण्यासाठी अनेकांनी पुणे-अमरावती, बडनेरा तसेच अमरावती, बडनेरा-पुणे असे आरक्षण आधीच करून ठेवले होते. मात्र, नेमक्या याच कालावधीत रेल्वेने मेगा ब्लॉक घेतल्याने प्रवाशांची चांगलीच गैरसोय झाली आहे. त्यांना आता इतर पर्यायी साधनांनी अमरावती, बडनेराला यावे लागेल किंवा प्रवासाचा बेतच रद्द करावा लागणार आहे.

# बहिरम यात्रेत भाविकांची विक्रमी गर्दी; लाखोंनी घेतले दर्शन

## ५० हजारांहून अधिक नारळ फुटले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२परतवाडा**

बहिरम यात्रेनिमित्त परतवाडा येथे दिवसेंदिवस भाविक भक्तांची संख्या वाढत असून, रविवारी (दि. ११ जानेवारी) यात्रेत प्रचंड गर्दीचे चित्र पाहायला मिळाले. केवळ एका दिवसात लाखोंच्या संख्येने भाविकांनी बहिरमबाबांचे दर्शन घेतले, तर ५० हजारांहून अधिक नारळ फुटल्याची माहिती मिळाली आहे. रविवार असल्याने यात्रेच्या गर्दीत लक्षणीय वाढ झाली होती.भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे मंदिरावर चढणाऱ्या पायऱ्यांवर मोठी कोंडी निर्माण झाली होती. परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने तातडीने मार्गात बदल केला. मंदिरावरून उतरण्यासाठी भाविकांना पायऱ्यांऐवजी डांबरी रस्त्याचा वापर करावा लागला. सकाळी ११ वाजल्यापासून मंदिरावर दर्शनासाठी लागलेल्या रांगा सायंकाळपर्यंत कायम असल्याचे दिसून आले.दुपारनंतर साडेबारा ते साडेतीन वाजेदरम्यान गर्दी आणखी वाढली. वाढती गर्दी लक्षात घेता कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाने बंदोबस्तात वाढ केली. शिरजगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार महेंद्र गवई हे अतिरिक्त पोलिस बंदोबस्तासह मंदिर परिसरात तैनात होते. दरम्यान, आदिवासी बांधवांनी गर्दी वाढण्यापूर्वीच सकाळच्या सत्रात बहिरमबाबांचे दर्शन घेतले.पार्किंग बंद, वाहनांच्या लांबच लांब रांगावाढत्या गर्दीमुळे मंदिरावरील पार्किंग बंद ठेवण्यात आले होते. यात्रा परिसरातील पार्किंगही दिवसभर 'हाऊसफुल्ल' राहिले. त्यामुळे अनेक यात्रेकरूंना वाहने लावण्यासाठी जागा मिळाली नाही. परिणामी यात्रा परिसराच्या बाहेर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक वळवलीपरतवाडा-बैतूल राष्ट्रीय महामार्ग अवजड वाहनांसाठी तात्पुरता बंद ठेवण्यात आला. तसेच लहान वाहनांनाही यात्रा परिसरात प्रवेश देण्यात आला नाही. या महामार्गावरील वाहतूक खरपी व करजगामार्गे वळवण्यात आली होती.पारंपरिक जेवणावळींना मोठी मागणीयात्रेत पारंपरिक रोडगे आणि आलू-वांग्याच्या भाजीच्या जेवणावळींची विशेष रेलचेल पाहायला मिळाली. गर्दीमुळे अनेक निमंत्रितांना जेवणावळींची ठिकाणे शोधताना चांगलीच धावपळ करावी लागली. दरम्यान, 'पन्नालाल' नावाच्या गाढवाने यात्रेकरूंच्या मनोरंजनात भर घातली.पुरेशा पोलिस बंदोबस्तामुळे वृत्त लिहेपर्यंत कोणतीही अनुचित घटना घडली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बहिरम यात्रेत भाविकांची ही वाढती गर्दी पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# शकुंतला रेल्वे स्टेशनवर पत्रकार दिनानिमित्त ५२ पत्रकार व नगराध्यक्षांचा भावपूर्ण सत्कार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अचलपूर**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिनाचे औचित्य साधत तसेच शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीच्या ३८ व्या प्रतीकात्मक जनआंदोलनाच्या निमित्ताने अचलपूर रेल्वे स्टेशन परिसरात भव्य पत्रकार व नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जुळवा नगरीतील आजी-माजी एकूण ५२ पत्रकार मित्रांचा तसेच अचलपूर नगरपालिकेच्या नवनियुक्त नगराध्यक्षा सौ. रुपाली अभय माथने यांचा भावपूर्ण नागरी सत्कार करण्यात आला.समाजासाठी निर्भय, निःपक्ष व निर्भीड लेखनातून जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या पत्रकारांचा सन्मान हा कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. यावेळी मूर्ती तालुक्यातील ज्येष्ठ पत्रकार डॉ. अनंत भारतीय, गजानन देशमुख व प्रमोद नईकेले यांचा विशेष सन्मान शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. रुपाली माथने, संपादक सुधीर गणवीर, पवन श्रीवास्तव, नंदेश अंबाडकर, संतोष नरेडी, प्रभाकर वानखडे, राजा धर्माधिकारी, योगेश खानझोडे, दिपा तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या भाषणात पत्रकारांनी शकुंतला रेल्वे प्रकल्पाच्या प्रश्नाकडे केंद्र सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी केली.या कार्यक्रमाचे आयोजन शकुंतला रेल बचाव सत्याग्रह समितीसह एकूण नऊ सामाजिक संघटनांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी पत्रकार भवनाची मागणीही ठळकपणे मांडण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध सामाजिक कार्यकर्ते, सत्याग्रही व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. ३८ जनआंदोलनाच्या आठव्या वर्षात प्रवेश करताना केंद्रिय रेल्वे मंत्र्यांचे लक्ष या आंदोलनाकडे वेधले जाईल का, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

# जुहू परिसरातील ३५ हजार नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १२ मुंबई**

एकीकडे जास्तीत जास्त मुंबईकरांनी मतदानासाठी बाहेर पडावं यासाठी प्रशासन प्रयत्नशील असताना जुहू परिसरातील सुमारे ३५ हजार नागरिकांनी मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचं जाहीर केलं आहे. जुहू परिसरातील जवळपास २०० इमारतीत राहणाऱ्या नागरिकांनी तसा निर्णय घेतला आहे. मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याच्या आशयाचे अनेक बॅनर जुहू रुईया पार्क, कराची सोसायटी परिसरात लागल्याचं दिसतंय.

जुहू परिसरात मिलिटरी रडार असल्यामुळे त्याचा फटका इथल्या नागरिकांना बसत असल्याचं चित्र आहे. गेल्या ३५ वर्षापासून इथल्या २०० धोकादायक इमारती आणि दोन झोपडपट्टी विकासकापासून रखडल्या आहेत. इमारतींचे पुनर्विकास होऊ शकत नसल्याने जवळपास ३५ हजार लोक या धोकादायक इमारतींमध्ये भीतीच्या सावटाखाली राहतात असा दावा करण्यात आला आहे.

या परिसरातील २०० इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिक आणि दोन झोपडपट्ट्यांमधील लोकांनी त्यांच्या समस्या या केंद्र सरकारच्या संरक्षण विभागासमोर मांडल्या. अनेकदा त्याचा पाठपुरवठा करूनही त्यांना यश आलं नाही. कायदा कालबाह्य आहे आणि त्यामुळे घरे उद्ध्वस्त होत आहेत. १९३९ च्या ब्रिटिश कायद्याअंतर्गत (१९७६ मध्ये अंमलात आणलेला) आम्हाला आमच्या कायदेशीर घरांमधून हाकलण्यात आले आहे. सुमारे २०० इमारती आणि दोन मोठ्या झोपडपट्ट्या धोक्यात असून इथल्या ३५,००० नागरिकांवर अन्याय होत आहे. त्यामुळे मतदानासाठी बाहेर पडण्यापूर्वी शंभर वेळा विचार करा आणि पुन्हा विचार करा. यापुढे खोटी आश्वासने आता चालणार नाहीत.




# शहरात मतदारांपर्यंत पोहोचताना उमेदवारांची दमछाक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि १२ अमरावती**

महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रचाराचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे. हा टप्पा सुरू झाला तरी अपवाद वगळता अनेक उमेदवारांना संपूर्ण प्रभागात दौरा करता आलेला नाही. विस्तारलेला प्रभाग आणि प्रभागातील महत्त्वाच्या चौकात आणि मतदारांच्या गाठीभेटी घेण्यास लागणारा वेळ यामुळे उमेदवारांची चांगलीच दमछाक होत आहे. मतदानाला कमी दिवस राहिल्याने उमेदवार रात्रीचा दिवस करत आहेत.

येथील ८७ नगरसेवकांसाठी निवडणूक सुरू असून, त्यासाठी येत्या १५ जानेवारीला मतदान घेण्यात येणार आहे. प्रचार करण्यासाठी १३ जानेवारीपर्यंत मुदत आहे. त्यामुळे या आगामी ५ दिवसांत त्यांना सर्व मतदारांपर्यंत पोहोचण्याचे आवाहन निर्माण झाले आहे.

उमेदवारांपर्यंत पोहोचणे शक्य नसल्याने कॉर्नर बैठका व सभांवर भर देण्यास सुरुवात केली आहे. असे असले तरी पश्चिम भागात अद्याप सभा झालेल्या नाहीत. घरोघरी



जाऊन प्रचार फेऱ्यांवर जोर दिला जात आहे. या भागात आगामी एक-दोन दिवसांत प्रचार सभांना सुरुवात होऊन शेवटच्या टप्प्यात सभांवर भर दिल्याचे दिसत आहे.

उमेदवारांना स्वतंत्रपणे प्रचार करण्याची वेळ आल्याने त्यांचीही धावाधाव होत आहे. सकाळपासून कार्यकर्त्यांवर तसेच कुटुंबातील सदस्यांवर प्रचाराची जबाबदारी सोपवून उमेदवार देखील प्रचाराच्या मोहिमेवर निघत आहेत. याशिवाय आगामी दोन ते तीन दिवसात जिल्ह्यात होणाऱ्या सभांवर राजकीय पक्षांच्या उमेदवारांच्या प्रचाराची धुरा अवलंबून असणार आहे. रविवारी सुटीच्या दिवशी होणाऱ्या प्रचाराच्या माध्यमातून मालेगाव शहरात प्रचाराचा धुराळा उडणार आहे.'

नवखे उमेदवार, नाराजी अन् मतविभागणीवर गणित शिंदेसेना व भाजपने या निवडणुकीत उमेदवारी देताना काही माजी नगरसेवकांना दूर करत नवीन चेहरे दिले आहेत. त्यामुळे निष्ठावंतांना डावलल्याचा व घराणेशाहीचा आरोप करण्यात येत आहे. त्यातच इच्छुकांमध्ये नाराजीचा सूर वाढला आहे. अशा या पक्षीय उमेदवारांबरोबरच काही उमेदवार रिंगणात आहेत. त्यांचा त्या-त्या भागातील जनसंपर्क चांगला असल्याने मताची विभागणी होण्याचे मोठे संकट उभे ठाकले आहे.

# मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतला विद्यमान सरपंचांची प्रशासक म्हणून नेमणूक करा

## सरपंच संघटनेचे अमरावती जिल्हाधिकारी यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

यापूर्वी १९९४ वर्षी सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्ती देण्यात आली होती कार्यवाही झाली होती आज सुद्धा तीच परिस्थिती राज्यात निर्माण झालेली आहे... अमरावती जिल्ह्यात एकूण ८४१ ग्रामपंचायती असून २०२६ मध्ये प्रथम टप्प्यातील ५५६ ग्रामपंचायतच्या निवडणुकीची प्रक्रिया जुलै २०२५ पासून सुरू व्हावयास पाहिजे होती व एक डिसेंबर २०२५ ला प्रारूप मतदार यादी १५ डिसेंबर २०२५ पासून निवडणूक प्रक्रिया सुरू करून जानेवारी २०२६ ला मतदान घ्यावयास पाहिजे होते मात्र २०२६ ला होऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीचा अजून पर्यंत कुठलाही कार्यक्रम प्रशासनाने लावलेला नाही यावरून सिद्ध होते की आज रोजी जिल्ह्यातील ८४१ ग्रामपंचायत पैकी ५५६ ग्रामपंचायत निवडणुकी करिता प्रलंबित असताना प्रशासन व निवडणूक आयोग दुर्लक्ष का



करीत आहे हा प्रश्न आहे फेब्रुवारी महिन्यात ग्रामपंचायतची मुदत संपत असल्यामुळे या ठिकाणी प्रशासक नेमणुकीची कार्यवाही जवळपास निश्चित करावी लागणार आहे अशातच प्रशासनाकडे आधीच कर्मचारी पदे रिक्त त्यात अतिरिक्त कामाचा भार या मध्ये भर म्हणून ग्रामपंचायतीवर कर्मचाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आल्यास ग्रामपंचायतीचे व शासकीय कामकाज यामध्ये फार अडचणी निर्माण होणार अशी परिस्थिती येताना दिसतेग्रामपंचायत आणि ग्राम विकासाचा खरा दुवा हा सरपंच आहे मागील पाच वर्षापासून सरपंच त्या ग्रामपंचायतीसाठी काम करत आले असून पंचायतीचे विकासाचे धोरण अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करताना सरपंच काम करतात म्हणून येणाऱ्या परिस्थिती मध्ये ग्रामविकास आणि ग्रामपंचायत ची कामे सुरळीत पद्धतीने चालू ठेवण्याकरिता प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये विद्यमान सरपंच यांनाच प्रशासक म्हणून नेमणूक करून ग्रामपंचायतचे कामकाजाचा तालमेड राखणे सोयीचे होईल व प्रशासनावर अतिरिक्त भार सुद्धा पडणार नाहीतरी फेब्रुवारी २०२६ ला प्रशासक नेमताना दिनांक २६ ९ १९९४ ते ७ ५ १९९४ या कालावधीत ज्या पद्धतीने कार्यरत सरपंचांनाच प्रशासक म्हणून नेमण्यात आले होते त्यानुसारच आता सुद्धा कार्यरत सरपंचांनाच प्रशासक पदी ठेवावे या मागणी चे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले

यावेळी सरपंच संघटनेचे पदाधिकारी सचिन भाऊ राऊत मा सरपंच भारवाडीसुरेंद्र भिवगडे सरपंच मोझरीमोनिकाताई बोराळकर सुरवाडीप्रिती ताई बुंदीले माहुली जहागीरमयुरीताई राऊत भारवाडीरिनाताई मंजु सार्शीदर्शनाताई मारबदे तळेगाव ठाकूरवैशाली ताई धुमोने गुरुदेवनगरनिलिमाताई समरीत वऱ्हागंगाताई गोरे मार्डीराजेंद्र मढवे धामंत्रीप्रीतीताई उईके शेंदोळा बु.आशाताई चौधरी शेंदूर्जना बाजारराहुल तायडे वरखेडमुक्ताताई ठाकरे पिंपळविहीरभुषण गाठे धोत्राबबिता ताई हरडे सालोरा खुर्दधर्मराज खडसे शिवणगावमिनाताई नायर कुऱ्हामालाताई माहुरे वडगांव मा.बादल पाळेकर डेहनीविकील वानखडे सार्शी ही सर्व मंडळी उपस्थित होती.

# मतदान जनजागृतीसाठी प्रशासनाचा सुरेल उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

येत्या महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रशासनाकडून स्वीप उपक्रमांतर्गत विविध नाविन्यपूर्ण आणि प्रभावी उपक्रम राबविण्यात येत आहेत. लोकशाही प्रक्रियेत जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग वाढावा आणि मतदानाची टक्केवारी लक्षणीयरीत्या वाढावी, या उद्देशाने हे उपक्रम राबविले जात असून, त्याला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.या स्वीप उपक्रमांतर्गत तापडिया मॉल येथे विशेष 'मतदान जनजागृती गाणे' सादर करण्यात येत असून, हे गाणे सध्या शहरात जनआकर्षणाचा विषय ठरत आहे. या गाण्याचे वैशिष्ट्य म्हणजे, या गीताचे गायन अमरावती महानगरपालिकेचे उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी स्वतः केले आहे. प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्याने थेट जनजागृती उपक्रमात सहभागी होत नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविल्याने या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.या मतदान गाण्याचे उद्घाटन महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर हे गाणे तापडिया मॉलसह शहरातील विविध चित्रपटगृहांमध्ये दाखविण्यात येत आहे. चित्रपट सुरू होण्यापूर्वी किंवा मध्यंतरात हे गाणे प्रदर्शित केल्याने मोठ्या संख्येने प्रेक्षकांपर्यंत मतदानाचा संदेश प्रभावीपणे पोहोचत आहे. मनोरंजनाच्या माध्यमातून दिला जाणारा हा संदेश नागरिकांच्या मनावर ठसा उमटवत असल्याचे चित्र आहे.यासोबतच शहरातील विविध शाळांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या सांस्कृतिक महोत्सवांमध्येही हे मतदान जनजागृती गाणे सादर करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांमधून तसेच शिक्षकवर्गाकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, लहान वयातच लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण होत आहे.विशेष म्हणजे, हे मतदान जनजागृती गाणे यूट्यूबवरही अपलोड करण्यात आले असून, अल्पावधीतच ते मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाले आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून हे गाणे विशेषतः तरुण वर्गापर्यंत पोहोचत असून, मतदानाबाबत सकारात्मक वातावरण तयार होत आहे. माझे मत, माझा अधिकार आणि लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान आवश्यक असा प्रभावी संदेश या गाण्याच्या माध्यमातून देण्यात आला आहे.स्वीप अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या या अभिनव उपक्रमामुळे अमरावती शहरात मतदानाबाबत जागरूकता लक्षणीयरीत्या वाढताना दिसून येत आहे. प्रथमच मतदान करणाऱ्या नवमतदारांमध्येही मोठा उत्साह निर्माण झाला आहे. प्रशासनाच्या या प्रयत्नांमुळे येणाऱ्या अमरावती महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी निश्चितच वाढेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत असून, लोकशाही अधिक बळकट करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे.

# विजयाचा गुलाल कोणीही उधळो; शेवटी विक्रेत्यांचीच 'चांदी'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१२अमरावती**

शहरातील मतदार कुणाच्या पाठीशी उभे राहतील आणि सत्ता कुणाच्या हाती जाणार, याचा निर्णय शुक्रवारी होईल. मात्र, एक गोष्ट ठरली आहे, विजयाचा गुलाल कोणीही उधळो, तरी गुलाल विक्रेत्यांचीच 'बल्ले बल्ले' होणार आहे. मतदानाच्या अगोदर प्रचार सभांना आणि प्रचार फेऱ्यांना जोरदार वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील व्यावसायिकांनी गुलालची साठवण करून ठेवली आहे. काहींनी तर मोठ्या शहरातून गुलालाची नवीन ऑर्डरही दिलेली आहे. व्यावसायिकांचे म्हणणे आहे की, ज्यांना विजयाची १०० टक्के खात्री आहे, ते आणि त्यांचे समर्थक मतदानाच्या दिवशी गुरुवारीच गुलाल खरेदी करतील. तसेच, कार्यकर्त्यांचा कल उच्च



प्रतीच्या गुलाल खरेदीकडे राहणार असल्याचेही व्यावसायिकांनी सांगितले. गुलाल विक्रेत्यांसाठी हा काळ आनंदाचा असल्याचे दिसते, कारण त्यांना मतदार आणि कार्यकर्त्यांच्या वाढत्या मागणीमुळे मोठा फायदा होणार आहे.

# ना राणा अन् ना पाना, फक्त कमळालाच निवडून आणा; मंत्री आकाश फुंडकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

अमरावती महापालिकेच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असताना कुरघोडीचे राजकारणही सुरू झाले आहे. आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षासोबत असलेली युती संपुष्टात आल्याची घोषणा भाजपने केल्यानंतर भाजपच्या नेत्यांनीही आक्रमक पवित्रा घेतला आहे. युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवारांना 'पाना' हे चिन्ह मिळाले आहे. याचा संदर्भ जोडत राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी रवी राणा यांना टोला लगावला आहे.

भाजपच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलताना आकाश फुंडकर यांनी 'युती तुटली, आता नो राणा, नो पाना, फक्त कमळालाच निवडून आणा' असे आवाहन केले. भाजपचा महापौर व्हायला हवा, भाजपचे पॅनेल सर्व



ठिकाणी निवडून यायला हवे, यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे फुंडकर म्हणाले.

**डॉ. अनिल बोंडेही मैदानात**

भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी देखील साईनगर येथील प्रचार सभेत बोलताना रवी राणा यांचे नाव न घेता त्यांना प्रत्युत्तर दिले. डॉ. बोंडे म्हणाले, साईनगर प्रभागात आमच्याकडे चारही कमळ चिन्हावर उभे असलेले उमेदवार हे अस्सल आहेत. आमच्याकडे ओरिजिनल असताना तुमचे झेंडू आम्ही उधार का घेऊ, असे म्हणत बोचरी टीका केली. युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार निवडून आल्यानंतर भाजपमध्ये जातील, असा प्रचार काही घटकांकडून सुरू झाल्याचा संदर्भ देत डॉ. बोंडे म्हणाले, साईनगर प्रभागातून तुषार भारतीय, चेतन गावंडे हे गेल्यावेळीही निवडून आले होते. हा प्रभाग हिदुत्वाला मानणारा प्रभाग आहे. जेव्हा राजकमल चौकात दंगल पेटली होती, तेव्हा हेच लोक हिंदूंच्या संरक्षणार्थ चौका-चौकात उभे होते. आम्ही निवडून आल्यानंतर भाजपला समर्थन देऊ, असे म्हणणारे तेव्हा कुठे गेले होते, असा सवाल डॉ. बोंडे यांनी केला. कुणीही येवो, कितीही आवाहन करो, आपल्याला भाजपच्याच चारही उमेदवारांना निवडून आणायचे आहे, असे आवाहन डॉ. बोंडे यांनी केले.


**असदुद्दीन ओवसी यांचाही टोला**

भाजप आणि युवा स्वाभिमान पक्षात सुरू झालेल्या संघर्षाचा संदर्भ देत एआयएमआयएम पक्षाचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांनी देखील येथील प्रचार सभेत बोलताना रवी राणा यांचा पाना मोदी यांचे नट कसत असल्याचा टोला लगावला होता. युवा स्वाभिमान पक्षाचे ३४ जागांवर उमेदवार उभे केले असून काही ठिकाणी युवा स्वाभिमान आणि भाजपचे उमेदवार समोरासमोर आहेत. त्यामुळे भाजपने आक्रमक भूमिका घेतली आहे.

# राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव: मातृतीर्थ सिंदखेड राजात उसळला जनसागर, वंशजांच्या हस्ते महापूजा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२बुलढाणा**

राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा ४२८ वा जन्मोत्सव सोहळा सोमवारी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिजाऊंचे जन्मस्थान असलेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीत दर्शनासाठी बुलढाणा जिल्ह्यासह राज्यभरातील जिजाऊ व शिवभक्तांचा सकाळपासूनच जनसागर लोटला . सकाळी ६ वाजता राजे लखुजीराव जाधव राजवाड्यातील राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थानी वंशज राजे शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. तसेच



केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांनी सपत्नीक राजमाता माँ जिजाऊ यांची महापूजा करुन अभिवादन केले.

यावेळी सिंदखेड राजाचे आमदार मनोज कायंदे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे यांनीही राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

**जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांचे अभिवादन, जिजाऊ सृष्टीला भेट**

राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील आणि जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सोमवारी सिंदखेड राजा येथील श्री लखुजाराव जाधव राजवाड्यातील जिजाऊ जन्मस्थळी भेट देवून अभिवादन केले. यावेळी त्यांनी जिजाऊ सृष्टीस भेट दिली.

यावेळी उपविभागीय अधिकारी संजय खडसे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी आदित्य सिंग, तहसीलदार अजित दिवटे, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे, राज्य संघटक मनोहर तुपकर, जिल्हाध्यक्ष रविंद्र चेके, व्यवस्थापक सुभाष कोल्हे आदी मान्यवर उपस्थित होते.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत